www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ११८ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचा मार्ग झाला मोकळा

## लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

● मुंबई, यश सावंत :

अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी प्रशासनाला दिले. यामुळे आता अभ्युदय नगर म्हाडा वसाहत पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

विधानपरिषद सदस्य प्रविण दरेकर यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक घेतली होती. त्यावेळी हे निर्देश दिले. या बैठकीला गृहनिर्माण मंत्री अतुल सावे (दूरदृष्यप्रालीद्वारे), विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड, गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल, मुख्याधिकारी मिलींद बोरीकर, उपसचिव अजित कवडे, अवर सचिव अरविंद शेटे, अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाचे माजी अध्यक्ष



नंदकुमार काटकर, उपाध्यक्ष विलास सावंत यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

बैठकीत उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी प्रकल्पातील रहिवाशांच्या मागण्या जाणून घेतल्या. अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाची निविदा काढतांना त्यामध्ये सदनिकेचे क्षेत्रफळ हे ६३५ चौरस फूट पेक्षा जास्त असावे, भविष्याच्यादृष्टीने सदनिकाधारकाला चारचाकी वाहन पार्किंग असावी, सदनिकेची किंमत खुल्या बाजारभावानुसार असावी अशा अटी समाविष्ट करण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या उच्चाधिकार समितीची मान्यता घेवून पुनर्विकास प्रकल्पाची निविदा लवकरात लवकर काढा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. विधानपरिषदेचे सदस्य प्रविण दरेकर यांनी अभ्युदय नगर पुनर्विकासासाठी राज्य शासन घेत असलेल्या निर्णयाबाबत शासनाचे विशेषत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. या निर्णयामुळे सुमारे अभ्युदय नगर वसाहतीतील १५ हजार रहिवाशांना फायदा होणार आहे. या निर्णयामुळे मुंबईतील मराठी माणूस, कामगार आनंदी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी रहिवाशांनी स्ट्रक्चरलचे पैसे भरले आहेत. हा पुनर्विकास प्रकल्प पथदर्शी प्रकल्प म्हणून ओळखला जावा. काँक्रीटचे जंगल न होता चांगले काम व्हावे अशी मागणी करुन शासनाच्या क्रांतीकारक निर्णयांचे कौतुक महासंघाच्या प्रतिनिधींनी यावेळी केले. म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे सादरीकरण करुन प्रकल्पाविषयी माहिती दिली.

## थोडक्यात



### "फडणवीस साहेबांना संधी दिली आहे त्यांनी आमच्या मागण्यांकडे विशेष लक्ष घालावे.."; जरांगेंचा फडणवीसांना इशारा

● जालना, दिगंबर जाधव :

विधानसभा निवडणुकांच्या आधी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणाचे अस्त्र उपसले आहे. जालन्यामध्ये सुरु असलेल्या जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा बुधवारी दुसरा दिवस होता त्यांची प्रकृती खालावल्याचे समोर आले. बुधवारी सकाळी आरोग्य विभागाच्या डॉक्टरांच्या पथकाने त्यांची तपासणी केली. यावेळी जरांगे यांची शुगर डाऊन झाली असून ब्लड प्रेशर आणि ऑक्सिजन लेवल नॉर्मल असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जरांगे यांचा अशक्तपणा वाढला असल्याने त्यांना उपचार घेण्याची विनंती यावेळी डॉक्टरांनी केली मात्र त्यासाठी त्यांनी नकार दिला. तसेच यावेळी मराठा आरक्षणावरुन त्यांनी राज्य सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला आहे. पान २ वर

### पृथ्वीच्या रक्षणासाठी बांबू शेती उपयुक्त - राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल



● मुंबई, विशाल पाटील :

जागतिक तापमानातील वाढ, वातावरणातील बदल आणि कार्बन उत्सर्जनाच्या वाढत्या प्रमाणामुळे मानवजाती आणि पृथ्वी धोक्याच्या उंबरठ्यावर आहे. या मानवजाती आणि पृथ्वीला वाचविण्यासाठी बांबू शेती करणे अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केले आहे.

१८ सप्टेंबर हा दिवस जगभरात बांबू दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित जागतिक बांबू दिवस उत्साहात साजरा करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला पद्मश्री भारत भूषण त्यागी, पद्मश्री कमल सिंग, पद्मश्री गेनाजी चौधरी, पद्मश्री सुलतान सिंग, पद्मश्री चंद्रशेखर, पद्मश्री जगदिश प्रसाद पारेख, मनरेगाचे महासंचालक नंदकुमार, प्रधान सचिव प्रवीण दराडे, दूरदर्शन निवेदिका मेघाली दास व्यासपीठावर उपस्थित होत्या.

श्री. पटेल पुढे म्हणाले की, भारतातील राज्यांमध्ये तापमानात वाढल्याची नोंद झाली आहे. दुबईत सुद्धा प्रचंड तापमानात वाढ झाली आहे. कार्बन उत्सर्जनामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत चालले आहे. ऑक्सिजन वाढविण्यासाठी झाडे लावल्याशिवाय पर्याय नाही. मानवजाती आणि पृथ्वीचे भविष्य धोक्यात आले आहे. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हरित ऊर्जेच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पान २ वर

# आता दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी आतिशी मार्लेना लवकरच विराजमान होणार

### अरविंद केजरीवाल शासकीय निवासस्थान सोडून सुविधांचाही त्याग करण्याची शक्यता



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबर रोजी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. अरविंद केजरीवाल यांच्यानंतर आता दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी आतिशी मार्लेना लवकरच विराजमान होतील. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर ते १५ दिवसांमध्ये त्यांचं शासकीय निवासस्थान सोडणार आहेत. यानंतर ते दिल्लीतील सर्वसामान्य लोकांमध्ये राहतील. या बरोबरच केजरीवाल त्यांची सुरक्षा, गाडी, ड्रायव्हर आणि कर्मचारी यांसारख्या इतर सर्व सुविधांचा लाभ घेणार नाहीत. खरं तर कोणत्याही निवडून आलेल्या मुख्यमंत्र्यांना अनेक शासकीय सुविधा मिळत असतात. मात्र, मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर केजरीवाल यांनी पहिली गोष्ट म्हणजे १५ दिवसांत शासकीय निवासस्थान सोडण्याचा निर्णय घेतला. पान २ वर

# भिवंडीत विसर्जन मिरवणूकी दरम्यान दगडफेक

## पोलिसांकडून शहरात कडेकोट बंदोबस्त



● ठाणे, रोहित जैसवार :

अनंत चतुर्दशी निमित्ताने गणेश विसर्जन मिरवणूकीत रात्री दगडफेक झाल्याने तणाव निर्माण झाला होता. यावेळी काही वाहनांची तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी रात्री उशीरा जमावावर लाठीमार केला. काही पोलीस कर्मचारी देखील जखमी झाले आहेत. बुधवारी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. गेल्याकाही दिवसांपासून भिवंडीचे वातावरण दुषित करण्याचे कार्य समाजकंटकांडून सुरू झाले आहे असे रहिवाशांचे म्हणणे आहे. पान २ वर

# रायगडमध्ये भीषण अपघात ! तिघांचा जागीच मृत्यू

● रायगड, सचिन कदम :

रायगडमधून एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. यामध्ये ३ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. रायगडच्या पाली खोपोली मार्गावर हा भीषण अपघात झाला. परळीजवळ कानसळ गावाजवळ एका स्कूलबसने बाईकला धडक दिल्याने हा अपघात झाला. मृत तरुण हे बाईकवरून ट्रिपल सीट प्रवास करत होते. परळीजवळ कानसळ गावाजवळ स्कूलबसने बाईकला समोरून धडक दिली. पान २ वर

# माथेरानच्या डोंगरात महाराष्ट्रातील सर्वात लांब बोगदा !

## आता बदलापूर ते पनवेल प्रवास फक्त १० मिनिटात



● ठाणे, भावना जैन :

बडोदा जेएनपीटी महामार्गावर महाराष्ट्रातला सर्वात लांब बोगदा माथेरान डोंगरात हा बोगदा खोदण्यात आला आहे. बदलापूर ते पनवेल असा सव्वाचार किलोमीटर लांबीचा हा बोगदा आहे. या बोगद्याचं काम १५ महिन्यांच्या विक्रमी कालावधीत पूर्ण करण्यात आला आहे. या बोगद्यामुळे बदलापूर आणि नवी मुंबईला एक नवीन कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. हा बोगदा २२ मीटर रुंद असून त्यात चार मार्गिका असणारेत. सध्या बोगद्यांच्या आतमध्ये प्लॅस्टरिंगचं काम सुरू असून त्यानंतर रस्ते आणि अन्य कामं केली जाणारेत. बदलापूर ते पनवेल हा प्रवास अवघ्या १० मिनिटात करता येणं शक्य होणार आहे. तर बदलापूर ते मुंबई हा प्रवास अटल सेतू मार्गे अवघ्या ३० ते ४० मिनिटात करता येणार आहे. पान २ वर

# पुणे पोलीस आ. अमितेश कुमार विसर्जन मिरवणुकित नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर करणार कारवाई

● पुणे, अभिजीत येरल्लू :

देशासह राज्यभरातील गणेश भक्तांनी लाडक्या गणपती बाप्पाला जड अंत:करणाने निरोप दिला. पुण्यातील विसर्जन मिरवणुका कोणत्याही विघ्नाविना शांततेत पार पडल्या. मंगळवारी सुरू झालेल्या मिरवणुका बुधवारी दुपारी तीन वाजता संपल्या. पुणे पोलिसांकडून मिरवणूक संपल्या असं जाहीर करण्यात आलं आहे.



तब्बल २८ तास पुण्यातील विसर्जन मिरवणुका सुरू होत्या. पुणे पोलीस आयुक्तांनी मिरवणुका संपल्यावर बोलताना काही मंडळांवर कारवाई होणार असल्याची माहिती दिली आहे. पुण्यातील गणपती विसर्जन मिरवणुका २८ तास मिरवणूक सुरू होत्या. पुण्यामध्ये ८ हजार अधिकारी कर्मचारी बंदोबस्तात तैनात होते. शांततेत गणेशोत्सव पार पडला त्याबद्दल सर्व मंडळ आणि भक्तांना धन्यवाद. यंदाच्या वर्षी मिरणुकांमध्ये लेझरला पूर्ण पणे बंदी होती. त्यासोबतच आवज मर्यादे संदर्भात देखील डेसीबील मोजण्याच्या मशीन होत्या. ज्या ठिकाणा या नियमांचे उल्लंघन केले गेले त्या ठिकाणी कारवाई करणार असल्याचं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी म्हटलं आहे. पान २ वर

# CAF जवानाकडून साथीदारांवर अंदाधुंद गोळीबार

## १ जवानाचा जागीच मृत्यू तर ३ जवान झाले जखमी



● छत्तीसगड, विशाल पाटील :

छत्तीसगडमधील बलरामपूर जिल्ह्यात एक हृदयद्रावक घटना घडली. एका CAF जवानाने आपल्याच साथीदारांवर अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत दोन जवान शहीद झाले तर अन्य दोघे जखमी झाले. बुधवारी दुपारी एक वाजता ही घटना घडल्याचे समजते. सुरगुजा विभागातील बलरामपूर येथील सामरी पोलीस स्टेशन परिसरात भुताही कॅम्प येथे बुधवारी ही घटना घडली. वादामुळे जवान अजय सिदारने अचानक गोळीबार सुरू केल्याचे सांगितले जात आहे. गोळीबाराचा आवाज ऐकून तेथे उपस्थित असलेले इतर हवालदार धावत आले असता प्रकरणाची माहिती मिळाली. गोळीबार करणाऱ्या जवानाला इतर हवालदारांनी ताब्यात घेतले. या घटनेत एका जवानाचा जागीच मृत्यू झाला तर तीन जवान जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वाटेतच आणखी एका जवानाचा मृत्यू झाला. तेथे उपस्थित अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना या घटनेची माहिती दिली. वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. दुसरीकडे, जखमींपैकी जवान राहुल आणि अनुज शुक्ला यांना आरोग्य केंद्रात उपचारानंतर अंबिकापूरच्या वैद्यकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. खरे तर ज्या कॅम्पमध्ये गोळीबाराची घटना घडली तो कॅम्प मागील वर्षीच सुरू करण्यात आला होता. पान २ वर

# भाजपा खासदार अनिल बोंडेंच्या विधानामुळे राहुल गांधींच्या जीवाला धोका;

## बोंडेंना तात्काळ अटक करा: माजी मंत्री यशोमती ठाकूर

● अमरावती, नितीन देवळेकर :

भाजपा खासदार अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. बोंडे यांचे विधान समाजामध्ये राहुल गांधी यांच्याबद्दल द्वेष निर्माण करून त्यांच्यावर लोकमानसातून हल्ला व्हावा याकरिता उद्युक्त करणारे आहे. अनिल बोंडेंच्या वक्तव्यामुळे राहुल गांधींच्या जीवाला धोका निर्माण झाला असून अनिल बोंडे यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना अटक



करावी अशी मागणी माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी केली. पान २ वर

# लोकसभेप्रमाणे विधानसभेतही जागावाटपांचा तिढा कायम; अमित शहा सोडवणार का जागेचा तिढा?



● मुंबई, विशाल कारंडे :

विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. पुढील १५ दिवसात आचारसंहिता लागू होईल, असे भाष्य भाजप नेते गिरीश महाजन यांनी केले होते. तर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणुका होतील, असे संकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. मात्र महायुतीतील तीन पक्षांचा जागावाटपाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. कोण कुठल्या जागा लढणार? किती जागा लढणार? यावर अजून शिक्कामोर्तब झालेले नाही.

मात्र आता महायुतीने आपल्या जागावाटपाबाबतची चर्चा पूर्ण करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतच मुदत निश्चित केली आहे. लोकसभेप्रमाणे विधानसभेतही जागावाटपांचा तिढा कायम आहे. यावर निर्णय घेण्यासाठी आता डेडलाईन ठरवण्यात आली आहे. सप्टेंबर महिनाअखेर जागावाटपाची चर्चा पूर्ण केली जाणार असून ज्या जागावर तिढा आहे, त्याचा तोडगा अमित शहा यांच्याकडून सोडवला जाणार असल्याचं सांगितलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजित पवार एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस एकनाथ शिंदे या नेत्यांमध्ये जागा वाटपाबाबत दोन स्वतंत्र बैठका झाल्या आहेत. या बैठकीत ज्या कॉमन जागांवर आग्रह आहे, अशा जागांबाबत चर्चाही झाली. मात्र, ज्या जागांवर तीनही पक्ष आग्रही आहेत. अशा जागांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. हा तिढा अमित शहा यांच्या मध्यस्थीने सुटणार आहे. दरम्यान लोकसभेच्या निवडणुकीवेळीही जागावाटपाचा तिढा होता. हा तिढा शहा यांनी सोडवला होता.

# संपादकीय

## नव्या शैक्षणिक धोरणातील आव्हाने

नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी स्पष्ट रोडमॅप प्रदान न केल्याने उच्च शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. नवीन शैक्षणिक धोरणाला 29 जुलै 2020 रोजी केंद्र सरकारने मान्यता दिली व ते 2023 2024 या शैक्षणिक वर्षात अस्तित्वात आले. या धोरणाचा उद्देश 2030 पर्यंत भारतीय शिक्षण व्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याचा असल्याने याला एक नवीन दिशा देणारे आणि 'गेमचेंजर' दस्तऐवज म्हणून संबोधले जाते. हे नवीन शैक्षणिक धोरण राबविताना, बरीच आव्हाने समोर येत आहेत.

विद्यार्थ्यांना विस्तृत विषयांमध्ये एकाच वेळी अध्ययन करायला मिळणार असले तरी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर अधिक भर दिल्याने, कला आणि सामाजिक विज्ञान या विषयांवर कमी लक्ष दिले जाण्याची शंका येथे स्वाभाविकपणे उपस्थित होते. त्यामुळे असे संकुचित लक्ष विद्यार्थ्यांच्या एकूण बौद्धिक आणि सर्जनशील वाढीस अडथळा आणू शकते. एकाच वेळी विविध विद्याशाखेच्या विषयांच्या अध्यायनामुळे विद्यार्थी, 'जॅक ऑफ ऑल आणि मास्टर ऑफ नन' होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नवीन शैक्षणिक धोरणात प्रत्येक विद्यार्थ्याला एक मेजर विषय, एक मायनर विषय, एक जेनरिक / ओपन इलेक्टिव्ह विषय, एक व्यवसाय व कौशल्य संबंधित विषय, क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान प्रणाली आणि मूल्यशिक्षण अभ्यासक्रम इत्यादीमधून क्रेडिट्स (गुण) प्राप्त करावे लागणार आहे. त्याचबरोबर इंटर्नशिप / फील्ड प्रोजेक्ट / शिक्षणार्थी / सामुदायिक प्रतिबद्धता आणि प्रमुख विषयाशी संबंधित सेवा, सहअभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प पण अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. एवढे सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने मेजर (मुख्य) विषयातील बराचसा आवश्यक भागच (विषय) अभ्यासक्रमात घेणे शक्य न झाल्याचे असे मत बहुतांशी शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मेजर विषय हा महत्त्वाचा असूनही त्यातील महत्त्वाचे विषय/भाग मुलांच्या अभ्यासक्रमात न आल्याने अभ्यासक्रमाचा दर्जा घसरल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना एकाचवेळी एवढ्या विविध उपक्रमांतून क्रेडिट्स (गुण) मिळविणे कितपत सोयीस्कर पडेल किंवा झेपेल या प्रश्नाचे उत्तर काळच ठरवेल.

नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर जोर दिला गेला आहे. सतत व्यावसायिक विकास आणि प्रोत्साहनांसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव, वर्गखोल्यांमध्ये दिल्या जाणार्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम करू शकतो. मोठ्या संख्येने असलेल्या शिक्षकांच्या दर्जेदार प्रशिक्षणाची व्यवस्था कमी पडू शकते. देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण (स्टॅंडर्डायझेशन) करण्याच्या धोरणाचे उद्दिष्ट प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधतेकडे दुर्लक्ष करू शकते. सर्वसामान्य एकच दृष्टिकोन, कदाचित भिन्न राज्ये आणि प्रदेशांतील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय गरजा आणि आकांक्षा पूर्ण करू शकणार नाही, अशी शंका उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते व त्यामुळे विद्यार्थ्यांचा आकलनाचा प्रवास सुलभ आणि समृद्ध होतो. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात गैर व्यावसायिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्याचा मानस आहे. यात प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षण, जसे आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन शाखा इत्यादी मातृभाषेत घेणार्यांची पंचाईत होऊ शकते. आजपर्यंत व्यावसायिक शिक्षण जे इंग्रजी भाषेत शिकवले जाते, ते आता देशातील विविध प्रांतात, त्या त्या मातृभाषेत देण्याचा मानस आहे.



### आजची चित्रोळी

ज्यांनी जगवून मोठे केलें
त्यांना विसरून गेलों !
नाविण्यातील सहजतेंत
तुम्हांस हरवून बसलों !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### आता दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी...

याबरोबरच त्यांना मिळणाऱ्या सर्व व्हीआयपी सुविधांचाही ते लाभ घेणार नाहीत", अशी माहिती संजय सिंह यांनी दिली.
सिंह पुढे म्हणाले, "देव त्यांच्या पाठीशी आहे. जवळपास सहा महिने केजरीवाल हे तुरुंगात गुन्हेगारांमध्ये राहिले. आताही देव त्यांचे संरक्षण करेन. ते आता सामान्य लोकांमध्ये राहणार आहेत. तसेच दिल्लीच्या जनतेवर आपला पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांना दिल्लीकर प्रचंड बहुमताने प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र देतील", असंही संजय सिंह म्हणाले.

### भिवंडीत विसर्जन मिरवणूकी दरम्यान दगडफेक

भिवंडी येथून रात्री १२.३० वाजाता एका मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक सुरू होती. मिरवणूक वंजारपट्टी नाका परिसरात आली असता, अचानक दगडफेक झाली. या घटनेनंतर या भागात मोठ्याप्रमाणात गर्दी झाली. घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी सुरू झाली. काहीवेळानंतर मोठ्याप्रमाणात जमाव याठिकाणी निर्माण झाला. तसेच काही वाहनांची तोडफोडही झाली. अखेर जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. काही पोलीस देखील जखमी झाले आहेत. जमावातील काहीजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी ठाणे पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त शहरात ठेवला होता. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन ठाणे पोलिसांनी केले आहे. मागील काही दिवसांपासून भिवंडीत काही समाजकंटकांकडून भिवंडीतील सामाजिक वातावरण बिघडविण्याचे कार्य सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### रायगडमध्ये भीषण अपघात ! तिघांचा जागीच मृत्यू

बसने धडक देताच हे तिघेजण गाडीवरून फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले आणि तिघांचा जागीच मृत्यू झाला.या अपघातानंतर स्थानिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर तिघांचे मृतदेह जांभूळपाडा प्राथमिक केंद्रात पाठवण्यात आले. मृत तिघांची अद्याप ओळख पटलेली नसून पोलीस या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

### माथेरानच्या डोंगरात महाराष्ट्रातील सर्वात लांब बोगदा !

या महामार्गामुळे जेएनपीटी बंदर येथून वाहतूक करणाऱ्या वाहनांना बदलापूर मार्गे समृद्धी महामार्ग आणि दिल्ली-वडोदरा महामार्गाला कनेक्टीव्हीटी मिळणार आहे. या बोगद्यामुळे पनवेल, तळोजा, कल्याण या मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे. दुसऱ्या बोगद्याचं काम ८० टक्के पूर्ण झालं आहे. या दुसऱ्या बोगद्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे. ऑक्टोबर महिन्यात या दुसऱ्या बोगद्याचं काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. दोन्ही बोगद्यांची मध्यभागांची उंची ही १३ मीटर आणि २२ मीटर इतकी आहे.

### पुणे पोलीस आ. अमितेश कुमार विसर्जन...

मोबाईल चोरी घटना घडल्या आहेत कमी घडल्या त्या सर्व बाबत कारवाई करून चोऱ्या उघडकीस आणू. महिला सुरक्षा बाबत काम केलं त्यात काही घटना घडल्या असतील तर त्यावर ही कारवाई करणार असल्याचं अमितेश कुमार यांनी सांगितलं.
पुण्यातील प्रमुख चार रस्त्यांवरून या मिरवणुका निघाल्या होत्या. मानाच्या गणपतीसह इतर मंडळ या मिरवणुकीत सहभागी झाले होते. अखेर मिरवणूक संपल्यानंतर आता अलका चौकामध्ये स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. गेले 28 तास हा रस्ता वाहतुकीसाठी बंद होता. काही वेळात मनपाच्या स्वच्छता विभागाकडून या ठिकाणी स्वच्छता राबवून हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

### CAF जवानाकडून साथीदारांवर अंदाधुंद गोळीबार

हा भाग पूर्वी नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली होता आणि तिथे रस्ता बांधणीचे काम सुरू आहे. या मार्गावरील पहिले कॅम्प बंदरचुआ येथे सुरू करण्यात आले. त्यानंतर रस्तेबांधणीचे काम जसजसे पुढे जात होते, तसतसे भुताही येथे छावणी सुरू करण्यात आली. छत्तीसगड सशस्त्र दलाच्या जवानांसह सीआरपीएफ आणि जिल्हा पोलीस दलाचे जवानही येथे तैनात करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबाराच्या घटनेनंतर लगेचच सर्व जवानांनी मिळून गोळीबार करणाऱ्या अजय सिदार या जवानाला पकडले. सध्या संपूर्ण घटनेचा तपास सुरू आहे. गोळीबाराचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### भाजपा खासदार अनिल बोंडेंच्या विधानामुळे राहुल...

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपाचे खासदार अनिल बोंडे यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करीत कारवाई करण्यासाठी अमरावतीच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. अनिल बोंडेंवर कायदेशीर कारवाई करावी यासाठी अमरावतीच्या पोलीस आयुक्तांना गराडा घालण्यात आला. अनिल बोंडे हे गेल्या चार-पाच वर्षांपासून सातत्याने धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, काँग्रेसच्या नेत्यांविरोधात हल्ले व्हावेत, असा प्रयत्न ते करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांचा तात्काळ अटक करावी, असे ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या.
जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अशा पद्धतीने वक्तव्य करून समाजामध्ये तेढ निर्माण करणे आणि दंगली भडकवण्याचा अनिल बोंडे यांचा प्रयत्न आहे. काँग्रेसच्या मागणीची दखल घेऊन पोलीसांनी खासदार अनिल बोंडे यांच्याविरोधात कलम १९२, ३५१(२) आणि ३५६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### फडणवीस साहेबांना संधी दिली आहे त्यांनी...

"एक वर्ष झालं आम्ही सरकारला सहकार्य करत आहोत. अजून किती दिवस तुम्हाला सहकार्य करायंच? फडणवीस साहेबांनी आमच्या मागणीची तातडीने अंमलबजावणी केली पाहिजे, आमच्या व्याख्येप्रमाणे सगे सोयरेची अंमलबजावणी तातडीने केली पाहिजे. तसेच हैद्राबादसह, सातारा, बॉम्हे हे तिन्ही गॅजेट दोन-तीन दिवसाच्या आत लागू करा, ही सरकारची जबाबदारी आहे. मी राजकीय भाषा बोलत नाही पण माझ्या मागण्या दोन दिवसात पूर्ण करत नाही तर येत्या काळात तुम्हाला अवघड दिवस असणार आहेत," असा थेट इशारा जरांगे पाटील यांनी दिला.
"फडणवीस साहेबांना संधी दिली आहे त्यांनी आमच्या मागण्यांकडे विशेष लक्ष घालावे. नाहीतर मराठ्यांचे कल्याण न होऊन द्यायला फडणवीस दोषी असतील. गरिबांवर मराठ्यांवर अन्याय करणारा फडणवीसंच आहे, आम्हाला राजकारणाशी देणंघेणं नाही, पण नंतर मला पाडापाडी कशी झाली? उभे कसे केले असं म्हणायचं नाही. या दोन-तीन दिवसात सगळे विषया मार्गी लावा. संधी दिली त्याची फडणवीस साहेबांनी सोने करावे. धनगर, मुस्लिम, शेतकरी यांना सरकारने नुसतं वेड्यात काढले आहे.

### पृथ्वीच्या रक्षणासाठी बांबू शेती उपयुक्त - राज्य कृषी...

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हरित महाराष्ट्र बनविण्यासाठी ठोस निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शाश्वत उत्पन्नासाठी बांबू शेतीची संधी शेतकऱ्यांना मिळाली आहे. शेतकऱ्यांनी कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारी आणि सर्वाधिक ऑक्सिजन निर्माण करणारी बांबू शेती करण्याची गरज आहे. या चर्चासत्र कार्यक्रमामुळे शेतकरी, शास्त्रज्ञ आणि सरकार यांना एका छताखाली आल्याने मोठी संधी उपलब्ध झाली आहे. बांबू शेतीसाठी महाराष्ट्रातच नाही तर देशभरात काम करावे लागेल, असे आवाहन श्री पटेल यांनी यावेळी केले.
राज्य शासनाच्या हरित महाराष्ट्रासंबंधी निर्णयाचे जगभरातील बहुतांशी देशांनी कौतुक केले आहे. त्यामुळे जगभरातील १७ देशातील आणि भारतातील १७ राज्यांच्या प्रतिनिधींकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गौरव होत आहे. महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धनासह बांबू शेती क्षेत्रात मोठे काम होत आहे. जगभरात त्याची दखल घेतली जात आहे, असे गौरवोद्गार श्री पटेल यांनी काढले.
पद्मश्री भारत भूषण त्यागी यांनी महाराष्ट्रात होत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनासाठी मानवी चेतना जागृत करण्याची गरज आहे. बांबू हे केवळ झाड नसून नैसर्गिक संरचनेतील महत्त्वाचा अंग आहे. बांबू शेतीची महाराष्ट्रातून पायाभरणी होत असल्याची मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी एमआरईजीएसचे महासंचालक नंदकुमार, प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी राज्य शासनाच्या 'हरित महाराष्ट्र' या योजनेविषयी माहिती दिली. या कार्यक्रमात राजस्थान, गुजरात, उत्तराखंड, उत्तरप्रदेश, झारखंड, आसाम, पंजाब, मध्यप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदी राज्यातील प्रगतीशील शेतकरी, आयआयटी दिल्ली, खरकपूर, विविध संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करा!

आजपासून म्हणजे १९ सप्टेंबर पासून भारतीय क्रिकेटचा नवा हंगाम सुरू होत आहे. या हंगामाची सुरुवात बांगलादेश सोबत आजपासून सुरू होणाऱ्या कसोटीपासून होत आहे. आजपासून चेन्नई येथील चेपॉक मैदानावर भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी लढत रंगणार आहे. बांगलादेशचा संघ भारतात दोन कसोटी आणि तीन टी २० सामने खेळणार आहे. या मालिकेकडे केवळ भारताचेच नाही तर क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे. वास्तविक बांगलादेश याआधी ज्या ज्या वेळी भारत दौऱ्यावर आला त्या त्या वेळी प्रसार माध्यमांनी आणि जागतिक क्रिकेटने त्याची म्हणावी दखल घेतली नाही त्याला कारणही तसेच होते कारण भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशात भारतच नेहमी वरचढ राहिला आहे. बांगलादेशने भारता विरुद्ध आजवर एकही कसोटी जिंकली नाही त्यामुळे बांगलादेश संघाला ना भारतीय प्रेक्षक जमेस धरत होते ना प्रसार माध्यमे मग यावेळेसच प्रसार माध्यमांचे आणि क्रिकेटप्रेमिंचे या दौऱ्याकडे लक्ष



का ? तर त्याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला काही दिवस मागे जावे लागेल. काही दिवसांपूर्वी बांगलादेशचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेला होता. या दौऱ्याकडे देखील प्रसार माध्यमांनी दुर्लक्षच केले होते कारण सर्वांना वाटले होते की पाकिस्तान बांगलादेशला सहज नमवेल कारण पाकिस्तान संघ हा बांगलादेश पेक्षा बलवान संघ होता मात्र प्रत्यक्ष घडले उलटेच. पाकिस्तानने बांगलादेशची शिकार करण्याऐवजी बांगलादेशनेच पाकिस्तानची शिकार केली. बांगलादेशने पाकिस्तानला सलग दोन कसोटीत नमवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. बांगलादेश अशी ऐतिहासिक कामगिरी करेल अशी अपेक्षा कोणालाच नव्हती मात्र त्यांनी ती कामगिरी केली. पाकिस्तानला नमवणाऱ्या बांगलादेश संघात जे खेळाडू होते तेच खेळाडू भारत दौऱ्यावर आले आहेत म्हणूनच या संघाने पाकिस्तानात जी कामगिरी केली त्याची पुनरावृत्ती ते भारतात करतील का ? हे पाहण्यासाठी संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष या मालिकेकडे लागले आहे. पाकिस्तानला पाकिस्तानात जाऊन पाणी पाजल्यावर बांगलादेश संघाचे मनोबल ही खूप वाढले आहे. बांगलादेशच्या कर्णधाराने थेट भारताला पराभूत करण्याची भाषा केली आहे अर्थात बांगलादेशने कितीही फुशारक्या मारल्या तरी बांगलादेश भारताला पराभूत करू शकत नाही कारण भारत म्हणजे पाकिस्तान नाही. भारताचा संघ हा क्रिकेट विश्वातील सर्वात बलवान संघ आहे.

भारताची फलंदाजी जगातील सर्वात बलवान फलंदाजी आहे तर गोलंदाजी जगातील सर्वात घातक गोलंदाजी आहे. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, शुभमन गील, विराट कोहली, के एल राहुल, ऋषभ पंत ही फलंदाजांची लाईन अप पाहिली तरी धडकी भरते. जगातील सध्याचा सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा आणि मोहंमद सिराज ही वेगवान जोडगोळी भारताला सुरुवातीलाच बळी मिळवून देतात तर आश्विन, जडेजा आणि अक्षर पटेल ही फिरकी तिकडी प्रतिस्पर्धी संघाला लोटांगण घालायला लावण्यास पुरेशी आहे शिवाय कुलदीप यादव हा देखील आपल्याकडे आहे त्यामुळे भारत ही मालिका २ - ० ने सहज जिंकेल आणि ती तशी जिंकायलाही हवी कारण ही मालिका भारताला विश्व टेस्ट चॅम्पियनशिपच्या ( WTC ) फायनल मध्ये पोहचवण्यासाठी खूप महत्वाची आहे. भारताने जर बांगलादेशला क्लीन स्वीप दिला तर भारताचे पॉइंट वाढतील त्याचा भारताला मोठा फायदा होईल. शिवाय भारताला विजयाची लय सापडेल कारण या मालिके नंतर भारताला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या तगड्या संघाविरुद्ध खेळायचे आहे. जर भारताला विजयी लय सापडली तर त्याचा फायदा इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध होऊ शकतो. म्हणूनच भारतासाठी ही महत्वाची मालिका आहे. भारतीय खेळाडूंना देखील हे चांगले माहीत आहे म्हणूनच भारतीय संघातील खेळाडू ही मालिका २ - ० ने जिंकण्यासाठी जीवाचे रान करतील यात शंका नाही. क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करण्यासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीर्वादाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे 10 दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे 10 दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तींचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तींचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा



प्रविण बागडे

सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसजनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवेद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



ठाणे महापालिकेच्यावतीने, केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीच्या निमित्ताने, महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, संदीप झिनवाल यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा मोहिम अंतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिर आयोजित

**ठाणे** - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वच्छ भारत दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने, १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत जिल्ह्यात 'स्वच्छता ही सेवा २०२४' मोहीम राबवण्यात येत असून 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ४३१ ग्रामपंचायती अंतर्गत सफाई कर्मचारी यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य तपासणी करण्यात आले. तसेच सफाई मित्र यांच्या कामांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात



आले आहे. या मोहिमेची थीम "स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता" अशी निश्चित करण्यात आली आहे. मोहिमेत 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' आयोजित करण्यात येत असून सफाई मित्रांसाठी एक खिडकी योजनेद्वारे विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या मोहिम अंतर्गत गावे श्रमदानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणी जसे सार्वजनिक स्थळे, धार्मिक स्थळे, बाजारपेठा, नद्यांचे किनारे, रस्ते आणि पर्यटन स्थळांची स्वच्छता करण्यात येणार आहे.

# मा.आमदार रविंद्र फाटक व संकल्प प्रतिष्ठान आयोजित देवीचा मंडपपुजन सोहळा संपन्न

**ठाणे** -: ठाण्यातील रघुनाथ नगर येथे मा. आमदार व शिवसेना उपनेते रविंद्र फाटक यांच्या पुढाकाराने व संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने ठाण्यातील सर्वात मोठा नवरात्र उत्सव साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्त मंडप पुजन सोहळा सोमवारी संपन्न झाला. दरवर्षी प्रमाणे यंदाही संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने व मा. आमदार रवींद्र फाटक यांच्या पुढाकाराने ठाण्यातील रघुनाथ नगर येथील संकल्प चौकात मोठ्या उत्साहात नवरात्र उत्सव साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्त सोमवारी मंडप पूजन मा. आमदार रविंद्र फाटक व माजी नगरसेविका जयश्री रविंद्र फाटक यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी माजी नगरसेवक दीपक वेतकर,माजी नगरसेविका नम्रता फाटक,राजेंद्र फाटक,शिवसेना विभागप्रमुख संजय भोसले या आदीसह मान्यवर उपस्थित होते. दरवर्षी मोठ्या उत्साहात हा नवरात्र उत्सव साजरा



होतो. नऊ दिवस दांडिया रास त्याच बरोबर बॉलिवूड कलाकार,मराठी चित्रपट कलाकार,नेतेमंडळी या नवरात्र उत्सवाला भेट देत असतात तसेच भाविक देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतात.यंदा देखील त्याच उत्साहात हा नवरात्र उत्सव साजरा होणार असून सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान मा. आमदार रवींद्र फाटक यांनी केले आहे.

# स्वप्नातील घर साकार होणार; प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एक व टप्पा दोन अंतर्गत गृहप्रवेश चावी वाटपाचा कार्यक्रम व मंजुरी पत्रक वितरण

**ठाणे** - प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ मधील मंजूर लाभार्थ्यांना मंजूरी पत्रांचे वितरण आज जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, ठाणे येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ मधील जिल्ह्यातील १४ मंजूर लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात घरकुल मंजूर पत्रक वितरण वितरण करण्यात आले तसेच प्रधानमंत्री आवास योजना टप्पा एक अंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुल दोन लाभार्थ्यांना





गृहप्रवेशाची चावी व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत तीन लाभार्थी यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गृहप्रवेशाची चावी देण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-१ अंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये आतापर्यंत पूर्ण झालेल्या दोन घरकुलांचे गृहप्रवेश करण्यात आले असून प्रशस्तीपत्र देऊन लाभार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी घरकुल बांधकाम करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा केली. ग्रामीण भागातील ग्रामस्थांचे घरकुल वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन मार्गदर्शन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत २४-२५ करिता ७ हजार १४१ उद्दिष्ट प्राप्त झाले आहे त्यापैकी सद्यस्थितीला ३ हजार ५५६ लाभार्थींना मंजुरी देण्यात आली असून २ हजार ६०१ पहिला हप्ता वितरण करण्यासाठी FTO जनरेट करण्यात आलेले आहेत अशी माहिती प्रास्ताविक करताना प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे छायादेवी शिसोदे यांनी माहिती दिली. यावेळी आयुक्त नगरपरिषद संचालनालय, नवी मुंबई मनोज रानडे, निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे संदीप माने, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन हरीश पाटील, मुख्याधिकारी कुळगाव बदलापूर मारुती गायकवाड, अतिरिक्त मुख्य अधिकारी अंबरनाथ अभिषेक पराडकर, सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एमसीएचआय ठाणे तर्फे रास रंग २०२४ चे आयोजन

## 'एमसीएचआय'तर्फे भाविकांना यंदाही नवरात्रोत्सवात पर्वणी , कोपरीतील जकात नाक्यावरील भव्य मैदानात ३ ऑक्टोबरपासून उत्सव...

**ठाणे** -: महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी असलेल्या समृद्ध व विकसित ठाणे शहरात यंदाही नवरात्रोत्सवात 'रासरंग २०२४' उत्सव भरविला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पांच्या मार्गदर्शनाखाली क्रेडाई-एमसीएच आय' ने २०१७ मध्ये सुरू केलेला हा कार्यक्रम यंदा नवी उंची गाठणार असून, ठाण्यातील हरिओम नगर येथील जकात नाक्यावरील भव्य मैदानावर ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता मातेच्या आरतीने उत्सवाला सुरुवात होईल. तत्पूर्वी या उत्सवाचे आज मंगळवार दिनांक १७



रोजी अनंत चतुर्दशीच्या दिवशी सकाळी १० वाजता मंगलमय वातावरणात भूमिपूजन संपन्न झाले .

बदलत्या ठाण्यातील नागरिक व तरुण पिढीची स्पंदने लक्षात घेऊन 'क्रेडाई-एमसीएचआय'ने आशर ग्रूप व जनसेवा प्रतिष्ठानच्या सहकार्याने ठाण्यात चंदाही रास-रंग उत्सव भरविला आहे. बॉलिवूडमधील 'डोल किंग' हनिफ, अस्लम आणि उमेश बारोट यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध गायिका द्रविता बोक्सी ओबेरॉय, फिरोज लडका, हेली मुझुमदार, रुपाली कश्यप यांच्या सुरामध्ये भाविकांना दांडियाचा आनंद लुटता येईल. त्याचबरोबर दररोजच्या आरतीवेळी प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते व अभिनेत्रींची उपस्थिती राहील, अशी माहिती क्रेडाई-एमसीएचआय' ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी दिली. था उत्सवामुळे ठाण्याच्या सांस्कृतिक लौकिकात भर पडली आहे, असे श्री. मेहता यांनी नमूद केले. विजेची आकर्षक व नेत्रदीपक रोषणाई आणि सुरेल संगीताच्या ठेक्यामध्ये भाविकांना पारंपरिक वेशभूषा करून दांडिया नृत्याचा आनंद लुटता येईल. या कार्यक्रमाचे निवडक उपक्रम वाहिन्या, स्थानिक टीव्ही चॅनल आणि www.rassrang.in या वेबसाईटवर थेट प्रसारण केले जाईल, अशी माहिती 'क्रेडाई-एमसीएच जाय' ठाणेचे सचिव श्री. मनिष खंडेलवाल यांनी दिली. या उत्सवाला आयएएस, आयपीएस यांच्यासह वरिष्व अधिका-यांचीही उपस्थिती राहील, असे ते म्हणाले. या दहा दिवसांच्या उत्सवाला १२ हजारांहून अधिक भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. ठाणे शहराबरोबरच मुंबई, कल्याण, डोंबिवली, भिवंडी येथील नागरिकांकडून रासरंग उत्सवाला आवर्जुन उपस्थिती दर्शविली जाते. त्यादृष्टीकोनातून भव्य उत्सवाचे नियोजन केले जात आहे.

# दहा दिवसांत 1200 हून अधिक गणेशदर्शन माजी आमदार नरेंद्र पवार यांचा गणेश दर्शनाचा अनोखा विक्रम

**कल्याण** : आपल्या दांडग्या जनसंपर्कासाठी प्रसिद्ध असलेल्या कल्याण पश्चिमेचे माजी भाजप आमदार नरेंद्र पवार यांनी एक अनोखा विक्रम केला आहे. नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवात पवार यांनी दहा दिवसांमध्ये तब्बल 1200 हून अधिक घरगुती-सार्वजनिक गणपती बाप्पांचे दर्शन घेत या विक्रमाला गवसणी घातली आहे. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातही अतिशय भक्तिभावपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कल्याण शहराला गणेशोत्सवाची फार जुनी आणि मोठी परंपरा लाभली असून लोकमान्य टिळकांच्या उपस्थितीत इथल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची बीजे रोवली गेली आहेत. इथल्या केवळ सार्वजनिकच नव्हे तर काही घरगुती गणेशोत्सवालाही 75 ते 100 वर्षांहून अधिकची दिर्घ परंपरा आहे. ही कल्याणची सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊनच माजी आमदार नरेंद्र पवार यांनीही मतदासंघातील सर्वच प्रमुख



सार्वजनिक आणि घरगुती गणपती उत्सवांना भेट दिल्याचे दिसून आले. यामध्ये कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि दक्षिणेकडून उत्तरेपर्यंत येणाऱ्या सर्वच भागांतील गणेशोत्सवाचा समावेश होता. विशेष म्हणजे सकाळी 8 वाजता सुरू झालेला हा गणेश दर्शन उपक्रम दुसऱ्या दिवशीच्या पहाटे 3-4 वाजेपर्यंत सुरू असायचा. यावरुनच पवार यांच्यातील उत्साहाची आणि दांडग्या संपर्काची प्रचिती येत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम - २०१३ अंतर्गत तक्रार समिती सर्व आस्थापनानी स्थापन करावी

**पालघर** (जिमाका) : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नियम दिनांक ०९/१२/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. या अधिनियमातील कलम ४ (१) अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्याची तरतुद आहे. या अधिनियमाच्या प्रकरण १ मधील कलम २ मध्ये नमूद व्याख्येनुसार प्रत्येक शासकीय / निमशासकीय कार्यालय, संघटना महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा, तसेच खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम / संस्था, इंटरप्राईजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायीक, शैक्षणिक, करमणुक, औदयोगिक, आरोग्य, सेवा किंवा वित्तिय युनिट, सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रूयालये, क्रिडा संस्था, संकुले इत्यादी अशा सर्व आस्थापना / कार्यालयांमध्ये अंतर्गत समिती स्थापन होणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ व नियम अन्वये अंतर्गत स्थापना कशी करायची याबाबतचा शासन निर्णय दि. १९/०६/२०१४ या मध्ये नमुद आहे. तरी आपण आपले आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास आपणांकडे अंतर्गत तक्रार समिती गठीत झाले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, पालघर या कार्यालयास सादर करावे,

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ च्या कलम २६ (१) (क) अन्वये अंतर्गत समिती स्थापन न केल्यास नियोक्त्यावर रु. ५०,०००/- ( पन्नास हजार रुपये ) दंडाची तरतुद आहे. त्यानंतर हि आपण वारंवार सुचना करुनही जर अंतर्गत समिती स्थापन केली नाही तर शासकीय यंत्रणा जे लागू असेल त्याप्रमाणे आपल्या कार्यालयाचे लायसन्स रद्द किंवा व्यवसाय रद्द किंवा व्यवसाय पुढे ठेवण्यास मज्जाव करण्यात येऊ शकतो.

# नारगोळ नंतर नवापुरात जागतिक पातळीवरील दुसऱ्या क्रमांकाचे कृत्रिम वन...

## कृत्रिम वनामुळे येणार नवापूर गाव पर्यटनाच्या नकाशावर - अंजली बारी

**पालघर** - पालघर तालुक्यातील नवापूर गावात एच डी एफ सी बँकेच्या सामाजिक दायित्व निधीमधून समुद्रकिनारी कृत्रिम वन उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. यात सात एकर क्षेत्रफळावर ९० प्रजातीचे सुमारे एक लाख आठ हजार झाडांची लागवड होणारं असून गुजरात राज्यातील नाळगोळ नंतर जागतिक पातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या नवापूर गावात कृत्रिम वन बनणार आहे.



नवापूर ग्रामपंचायत हद्दीतील दांडी खाडी नाक्याजवळ गावाच्या मालकीच्या १३ पैकी सात एकर जागेवर जागतिक पातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे समुद्रकिनाऱ्यालगत कृत्रिम वन उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन १४ सप्टेंबर रोजी करण्यात आले यामुळे काही वर्षानंतर नवापूर गाव पर्यटनाच्या नकाशावर येणार असल्याचे सरपंच अंजली बारी यांनी सांगितले आहे.

नवापूर गावातही किनाऱ्यालगत कृत्रिम वननिर्मिती झाल्यानंतर पर्यटकांचा ओघ वाढेल आणि नवापूर गावाची प्रगती होईल अशी अपेक्षा पर्यटक आणि पर्यावरणस्नेहींकडून व्यक्त केली आहे. येत्या काही वर्षात झाडांची घनता वाढल्यानंतर या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी वास्तव्य करणे अपेक्षित असून पर्यटकांसाठी हे कृत्रिम वन आकर्षक ठरेल असे मत नवापूरच्या सरपंच अंजली बारी तसेच फॉरेस्ट क्रिएटरचे संस्थापक आर. के नायर यांनी व्यक्त केले आहे. तारापूर औद्योगिक वसाहती मधील काही हरितपट्टांमध्ये तसेच काही कंपन्यांनी आपल्याकडे असलेल्या मोकळ्या जागेत मियावाकी कृत्रिम वनांची उभारणी यापूर्वीच केलेली आहे. मात्र सात एकर क्षेत्रफळावर उभे राहणारे नवापूर येथील कृत्रिम वन जगातील दुसऱ्या क्रमांकाचे किनाऱ्यालगतचे कृत्रिम वन ठरेल, अशी आशा आहे. तर दक्षिण गुजरातमधील नारगोळ या गावी जागतिक पातळीवरील समुद्रकिनाऱ्यावर उभारण्यात आलेले सर्वात मोठे कृत्रिम वन फॉरेस्ट क्रियेटर्स संस्थेच्या आर. के नायर व सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आले आहे. त्या ठिकाणी एक लाख २० हजार झाडे लावून त्यांची पाच वर्षांपेक्षा अधिक काळ जोपासना करण्यात आली आहे. नारगोळ येथे ९३ प्रकारच्या देशी प्रजातींची लागवड करण्यात आली आहे. येथे जपानी तंत्रज्ञानावर आधारित मियावाकी कृत्रिम वन उभे राहिले आहे. त्या ठिकाणी पाण्याच्या स्वतंत्र स्रोत्र निर्माण करण्यात आले आहेत.

# अनंत चतुर्दशीच्या दिवशी भक्तिमय वातावरणात कल्याण डोंबिवली परिसरातील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन



**कल्याण** : अनंत चतुर्दशीच्या दिवशी अत्यंत भक्तीमय वातावरणात कल्याण डोंबिवली परिसरातील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन सामाजिक, सेवाभावी संस्था यांच्या मदतीने तसेच महापालिका अधिकारी कर्मचारी पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्याने संपन्न झाले. कल्याण डोंबिवली महापालिका परिक्षेत्रात भाद्रपद महिन्यातील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन विविध विसर्जन स्थळावर करण्यात आले.

यामध्ये विसर्जन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत 52 (POP-46 व शाडू-5) श्री गणेश मूर्तींचे आणि विविध विसर्जन स्थळांवर पीओपीच्या 12965 श्री गणेश मूर्तींचे आणि शाडू मातीच्या 3764 अशा एकूण 16 हजार 781 श्री गणेश मूर्तींचे विसर्जन आज पहाटेपर्यंत करण्यात आले. कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी निर्मल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती. महानगरपालिकेने प्रमुख विसर्जन स्थळांवर फायर ब्रिगेड, स्वयंसेवक, रबर बोट त्याचप्रमाणे महापालिकेची ॲम्बुलन्स इ. सुविधा उपलब्ध केली होती.

काल दुपारी महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी स्वतः कल्याण डोंबिवलीतील विसर्जन स्थळांना भेटी देऊन विसर्जन व्यवस्थेची पाहणी केली. विसर्जन स्थळी जमा झालेले निर्माल्य डोंबिवली येथील श्री गणेश मंदिर संस्थान, एमआयडीसी येथील खत प्रकल्प,उंबर्डे बायोगॅस प्रकल्प त्याचप्रमाणे कचोरे बायोगॅस प्रकल्प , आयरे बायोगास प्रकल्प येथे पाठवण्यात आले आहे. या कामी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी संस्था एन एस एस चे विद्यार्थी यांचे सहकार्य महापालिकेस लाभले.

# रोहित शर्मा नाणेफेक हारला तर होणार मोठा गेम; चेन्नई पिचवर भारताने प्रथम फलंदाजी करावी की गोलंदाजी?




**भारत आणि बांगलादेश यांच्यातील मालिकेतील पहिला कसोटी सामना 19 सप्टेंबरपासून चेन्नईच्या चेपॉक येथील एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळला जाणार आहे. अशा परिस्थितीत चेन्नईच्या खेळपट्टीचा मूड काय असेल असा प्रश्न तमाम क्रिकेट चाहत्यांच्या मनात नक्कीच असेल. चेन्नईत नाणेफेक जिंकल्यानंतर काय करावे? प्रथम फलंदाजी की गोलंदाजी... चेपॉकमध्ये नाणेफेक जिंकल्यास रोहित शर्मा कोणाता निर्णय घेणार? येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे नंतर येथे फलंदाजी करताना टीम इंडियाचा रेकॉर्ड खराब आहे.**

भारतीय संघाने आपला पहिला कसोटी सामना फेब्रुवारी 1934 मध्ये चेपॉक चेन्नई येथे इंग्लंडविरुद्ध खेळला, या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा 202 धावांनी पराभव झाला. त्याच वेळी, भारतीय संघाने फेब्रुवारी 2021 मध्ये इंग्लंडविरुद्ध नुकताच कसोटी सामना खेळला होता. जिथे त्याने इंग्लंडचा 317 धावांनी पराभव केला. भारतीय संघ चेन्नईमध्ये एकूण 34 सामने खेळला आहे, येथे भारताने एकूण 15 सामने जिंकले आहेत. 7 सामने अनिर्णित राहिले आहेत. भारतीय संघाने येथे 11 सामने हारला आहे. आणि एक सामना टाय झाला.

आता हे 34 सामने समजून घेतले तर ज्या संघाने प्रथम फलंदाजी केली, त्या संघाने 12 वेळा विजय मिळवला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या संघाने 10 वेळा विजय मिळवला आहे. 11 सामने अनिर्णित राहिले आणि 1 सामना बरोबरीत राहिला.

भारतीय संघाने येथे 11 सामन्यांत प्रथम फलंदाजी केली आहे. यातील 6 सामने जिंकले आहेत, 1 सामना हरला आहे, तर 4 सामने अनिर्णित राहिले आहेत. भारतीय संघाने येथे प्रथम गोलंदाजी करत एकूण 23 सामने खेळले आहेत. त्यापैकी 9 सामने जिंकले, 6 सामने गमावले, 1 सामना बरोबरीत आणि 7 सामने अनिर्णित राहिले. म्हणजे चेपॉकमध्ये टीम इंडियाला नंतर गोलंदाजी उपयोगी पडणार नाही हे स्पष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत नाणेफेक जिंकल्यानंतर रोहित प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. पहिल्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघ : रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, सरफराज खान, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), आर अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, आकाश दीप, जसप्रीत बुमराह आणि यश दयाल.

## सतत टूथब्रश बदलणं गरजेचं आहे का? काय सांगतात आरोग्य तज्ज्ञ..

दररोज दिवसातून दोन वेळा म्हणजेच सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे ही आपल्या तोंडाच्या आरोग्यासाठी चांगली सवय आहे. परंतु, तुम्ही या कामासाठी योग्य साधन वापरत आहात का? तुमच्या टूथब्रशची परिणामकारकता त्याच्या स्थितीवर अवलंबून असते. डॉ. करिश्मा अॅस्थेटिक्सच्या कॉस्मेटिक दंतचिकित्सक डॉ. निशा ठक्कर यांनी याबाबत सल्ला दिला आहे.

डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, दातांमधील प्लेक, तसेच तुमच्या दात आणि हिरड्या यांच्यामध्ये अडकलेले अन्नाचे कण, त्याज्य घटक बाहेर काढता येतील अशा रीतीने टूथब्रशच्या ब्रिस्टल्सची रचना केली गेलेली असते. परंतु जीर्ण झालेले ब्रिस्टल्स दातांची व्यवस्थित साफसफाई करू शकत नाहीत. मग त्यामुळे दातांमध्ये पोकळी निर्माण होणे आणि हिरड्यांचे आजार आदी त्रास उद्भवण्याचा धोका वाढू शकतो.

टूथब्रश वापरण्याचा नियम काय?

डॉ. ठक्कर सामान्य नियमानुसार, दर दोन-तीन महिन्यांनी टूथब्रश बदलण्याची शिफारस करतात. ही कालमर्यादा हे सुनिश्चित करते की, तुमचे दात स्वच्छ करण्यासाठी ब्रिस्टल्स प्रभावी राहतील.

टूथब्रश खराब दिसू लागणे

दोन-तीन महिन्यांपूर्वीच तुमचा टूथब्रश तुटला किंवा ब्रिस्टल्स वाकलेले दिसू लागल्यास लगेच नवीन टूथब्रश वापरण्यास सुरुवात करा, असेही डॉक्टरांनी सांगितले आहे.

आजारपणातून बरे झाल्यानंतर जंतूंचा प्रसार रोखण्यासाठी डॉ. ठक्कर तुम्हाला किंवा कुटुंबातील सदस्यांना टूथब्रश बदलण्याचा सल्ला देतात. असे केल्या पुन्हा संसर्ग टाळण्यास मदत मिळते.

डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, टूथब्रश बदलण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून तुम्ही तुमच्या मौखिक आरोग्याचे अनेक फायदे घेऊ शकता.

ताजे ब्रिस्टल्स प्लेक, अन्नाचे कण काढून टाकण्यासाठी चांगले असतात; ज्यामुळे तोंड स्वच्छ आणि निरोगी होते. तसेच दातांमधील प्लेक काढून टाकल्याने दातांमध्ये पोकळी तयार होणे आणि हिरड्यांचे रोग होण्याला प्रतिबंध होतो.

तोंड स्वच्छ झाल्यास तोंडाला दुर्गंध येत नाही. अस्वच्छता निर्माण करणारे जीवाणू कमी होतात.

# 'बिग बॉस'ने घरातून काढले, पण चाहत्यांच्या मनातून कसे काढणार?



## आर्या जाधवचे अमरावतीत दणक्यात स्वागत

बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनमध्ये राडा करणारी रॅपर आर्या जाधवला बिग बॉसने घरातून बाहेर काढले असले तरी तिचे अमरावतीमध्ये दणक्यात स्वागत झाले. आर्या जाधव ही मूळची अमरावतीमधील आहे. बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनमध्ये ती स्पर्धक म्हणून सहभागी झाली होती. पण, तिने एका टास्कच्या दरम्यान घरातील सदस्य निक्की तांबोळीच्या कानशिलात लगावली होती. त्यामुळे बिग बॉसने तिची हकालपट्टी केली.

'हसल-२' या कार्यक्रमात रॅप सॉंगने आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अमरावतीकर आर्या जाधवने बिग बॉस मराठीच्या या सीझनमध्ये आपली छाप सोडली होती. आर्या ही अंतिम पाच स्पर्धकांमध्ये असू शकते असा अंदाज बांधला जात होता. बिग बॉसच्या घरात तिने सात आठवडे मुक्काम केला. या दरम्यान झालेल्या नॉमिनेशनमध्ये प्रेक्षकांनी तिच्या पारड्यात भरभरून मते टाकली. एका टास्क दरम्यान निक्कीने ओरबडल्यानंतर तिच्यावर हात उगारल्याने आर्यावर कठोर कारवाई करत बिग बॉसने तिची शोमधून गच्छंती केली. बिग बॉसच्या या निर्णयावर नेटकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या प्रकरणात निक्की आणि अरबाजवर कारवाई करण्याची मागणी नेटकऱ्यांनी केली होती.

बिग बॉसच्या घरातून बाहेर आल्यावर आर्याने आपली भूमिका चाहत्यांसमोर सोशल मीडियाच्या माध्यमातून मांडली. त्यानंतर आर्या तिच्या मूळगावी अमरावतीला परतली. त्यावेळी तिचे जंगी स्वागत करण्यात आले. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

ढोल, ताशे अन् रॅली...

अमरावतीला आल्यानंतर आर्याच्या चाहत्यांनी तिच्या स्वागत करताना खास रॅली काढली. यावेळी मोठ्या संख्येने चाहते उपस्थित होते. यावेळी जल्लोषात आर्याचे स्वागत करण्यात आले.

जवळपास दीड महिने बिग बॉसच्या घरात राहिल्यानंतर घरी परतलेल्या लेकीला पाहून आर्याच्या आईला अश्रू अनावर झाले. आर्याला भेटल्यानंतर काही चाहत्यांना आपल्या भावनांना अश्रूद्वारे वाट मोकळी करून दिली.

आर्याच्या आणि इतर काही इन्स्टाग्राम अकाउंटवर व्हिडीओ पोस्ट करण्यात आले. नेटकऱ्यांनी त्यावर आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

## दिनविशेष

**घटना**

२०२१ : कुंब्रे व्हिएजा ज्वालामुखीचा उद्रेक ला पाल्माच्या स्पॅनिश कॅनरी बेटावर झाला.

२०१७: पुएब्ला भूकंप २०१७ - मेक्सिको मध्ये झालेल्या भूकंपामुळे किमान ३७० लोकांचे निधन तर ६ हजार हुन अधिक लोक जखमी.

२००७: युवराजसिंग - हे टी-२० क्रिकेट सामन्यातील एका षटकात सहा षटकार मारणारे पहिले खेळाडू बनले.

२०००: कर्नाम मल्लेश्वरी यांनी सिडनी ऑलिम्पिक वेटलिफ्टिंग ६९ किलो वजन गटात ब्राँझ पदक मिळवले. असे करणाऱ्या त्या पहिलय भारतीय महिला बनल्या.

**जन्म**

१९७७ : आकाश चोप्रा- भारतीय क्रिकेटपटू

१९६५ : सुनिता विल्यम भारतीय अमेरिकन अंतराळवीर

१९५८ : लकी अली गायक, अभिनेते व गीतलेखक

१९४० : पिनाकी चौधरी - भारतीय चित्रपट दिग्दर्शक ( निधन: २४ ऑक्टोबर २०२२)

१९२५: बाबूराव गोखले - नाटककार (निधन: २८ जुलै १९८१)

१९१७: अनंतराव कुलकर्णी - कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे संस्थापक (निधन: ६ नोव्हेंबर १९९८)

१९१२: रुबेन डेव्हीड - भारतीय पशुवैद्य आणि प्राणीसंग्रहालय संस्थापक - पद्मश्री (निधन: २४ मार्च १९८९)

**मृत्यू**

२०२२ : विष्णू सेठी भारतीय लेखक आणि राजकारणी, ओडिशाचे आमदार (जन्म: ५ जून १९६१)

२०११ : जॉर्ज कॅंडल किमत- बेलीझ देशाचे पहिले पंतप्रधान (जन्म: १५ जानेवारी १९१९)

२००७ : दत्ता डावजेकर मराठी चित्रपट भावगीत व संगीतकार (जन्म: १५ नोव्हेंबर १९१७)

२००७ : डी. डी - संगीतकार दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर ऊर्फ (जन्म: १५ नोव्हेंबर १९१७)

२००४: दमयंती जोशी- सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना पद्मश्री (जन्म: ५ सप्टेंबर १९२८)

२००२: प्रिया तेंडुलकर - रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या (जन्म: १९ ऑक्टोबर १९५४)

१९९३ : दिनशा के. मेहता म. गांधींचे आरोग्य सल्लागार व सहकारी

# “तुझ्यासारखं व्यक्त होता येत नसलं तरी...”, प्रिया बापटच्या वाढदिवशी पती उमेशची खास पोस्ट



मराठी नाटक, चित्रपट, मालिका आणि वेबसीरिज अशा चारही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी हरहुन्नरी अभिनेत्री म्हणून प्रिया बापटला ओळखलं जातं. बालवयातच तिने मनोरंजनसृष्टीत पदार्पण केलं होतं. यानंतर ‘मुन्नाभाई MBBS’ चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्रीला दिग्गज कलाकारांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. पुढे, प्रियाने छोट्या पडद्यावर सक्रीयपणे काम करण्यास सुरुवात केली. कालांतराने ‘काकस्पर्श’, ‘मी शिवाजी राजे भोसले बोलतोय’, ‘हॅप्पी जर्नी’ अशा लोकप्रिय सिनेमांमध्ये तिने काम केलं. नेहमीच विविधांगी भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण करणारी प्रिया आज तिचा ३८ वा वाढदिवस साजरा करत आहे.

मराठी कलाविश्वासह बॉलीवूडमधून आज प्रियावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. तिने वैयक्तिक आयुष्यात २०११ मध्ये उमेश कामतशी लग्न केलं. या दोघांची जोडी नेहमीच चर्चेत असते. प्रिया-उमेशकडे अलीकडची तरुणाई ‘कपल गोल्स’ म्हणून पाहते. यांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. आज बायकोच्या वाढदिवसानिमित्त उमेशने एक खास पोस्ट शेअर करत प्रियाला शुभेच्छा दिल्या आहेत.

उमेश कामतची प्रियासाठी खास पोस्ट

उमेश कामत लिहितो, “प्रिया, तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! मला तुझ्यासारखं योग्य शब्दात व्यक्त होता येत नसलं, अचूक शब्दात कौतुक करता येत नसलं तरी, तुला माहीत आहे. माझं तुझ्यावर किती प्रेम आहे आणि मला तुझं किती कौतुक आहे. बाकी सगळं मला जे सांगायचंय ते मी हे Post करुन झाल्यावर Phone बाजूला ठेवला की, बाजूलाच बसलेल्या तुला प्रत्यक्ष सांगेनच”

उमेशने शेअर केलेल्या पोस्टवर श्रेया बुगडे, अमृता खानविलकर यांनी कमेंट्स करत अभिनेत्रीला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तर, सईने लाडक्या मैत्रिणीसाठी “वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा प्रि...” असं कॅप्शन देत प्रिया ( Priya Bapat ) बापटबरोबर एक गोड फोटो शेअर केला आहे.

दरम्यान, प्रियाच्याकामाबद्दल सांगायचं झालं, तर नुकताच ‘विस्फोट’ हा तिचा हिंदी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. याशिवाय गेल्या वर्षभरापासून ती ‘जर तरची गोष्ट’ या नाटकात प्रमुख भूमिका साकारत आहे. यात प्रियाच्या जोडीला उमेश मुख्य भूमिकेत काम करत आहे. त्यामुळे प्रिया-उमेशच्या जोडीला चाहते भरभरून प्रतिसाद देत आहेत.

## राशि भविष्य

**मेष** — स्वतःची प्रगती करणा-या प्रकल्पांमध्ये तुमची ऊर्जा खर्च करा त्यामुळे तुमची स्थिती सुधारेल. आर्थिक स्थिती चांगल्या प्रमाणात सुधारेल, मात्र त्याचवेळी खर्चाचे प्रमाण देखील वाढलेले असेल. तरुणाईचा सहभाग असणा-या उपक्रमात स्वतःला गुंतविण्यासाठी चांगली वेळ आहे.

**सिंह** — कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वतःला थांबवतात ही गोष्ट आज तुम्हाला चांगल्या प्रकारे लक्षात येईल. घरात नव्याने आलेल्या सदस्यामुळे साजरीकरण आणि पार्टीचे आनंददायी वातावरण तयार होईल.

**धनु** — संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. तुमच्या द्वारे धन वाचवण्याचे प्रयत्न आज अयशस्वी होऊ शकतात तथापि, तुम्हाला यापासून घाबरण्याची आवश्यकता नाही स्थिती लवकरच सुधारेल.

**वृषभ** — तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. आपल्या पालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आणि काळजी घेण्याची गरज भासेल. तुमच्या प्रिय व्यक्तीस भेटलात की तुमच्या मनावर प्रणयराधन करण्याचे विचार घोळतील.

**कन्या** — दुःखात असलेल्या व्यक्तीला मदत करून तुम्ही ऊर्जा मिळवा. इतरांच्या उपयुक्त ठरत असेल तर मदत करणे हेच संयुक्तिक आहे नाहीतर नश्वर देहाचा उपयोग तो काय ही बाब लक्षात ठेवा. भूतकाळातील गुंतवणूकीतून आमदनी वाढणे दृष्टीपथात येईल.

**मकर** — आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या दिवशी गुंतवणूक करणे टाळा. दिवसाच्या उत्तरार्धात अनपेक्षित गोड बातमी मिळाल्याने संपूर्ण कुटुंबात आनंदोत्सव साजरा होईल. वेळ, काम, पैसा, मित्र, कुटुंबीय, नातेवाईक हे सगळे एका बाजूला आणि तुम्ही व तुमचा जोडीदार दुसऱ्या बाजूला, एकमेकांत गुंफलेले.

**मिथुन** — शारीरक व्याधीपासून मुक्तता होण्याची शक्यता आहे. चैतन्याने सळसळता असा आणखी एक दिवस, अनपेक्षित लाभ दृष्टीपथात असतील. तुमच्या मनावर असलेले ओझे उचलण्यास आणि तुम्हाला पाठिंबा देण्यात नातेवाईक पुढाकार घेतील. प्रेमातील अपेक्षाभंग तुमची हिंमत तोडू शकणार नाही.

**तूळ** — प्रत्येकाला मदत करण्याच्या इच्छेमुळे तुम्ही आज थकून जाल, दमून जाल. चढउतारांमुळे फायदा होईल. सायंकाळी मित्रांबरोबर बाहेर जाणे अनेक गोष्टींसाठी चांगले असेल. आजच्या दिवस रोमँटीक असण्याचे संकेत प्रबळ आहेत. कठोर परिश्रम आणि योग्य प्रयत्नांमुळे चांगले फळ आणि पारितोषिक मिळू शकते.

**कुंभ** — सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील. कार्य क्षेत्रात किंवा व्यवसायात तुमचा निष्काळजीपणा आज तुम्हाला आर्थिक नुकसान देऊ शकतो. तुम्ही पार्टी देण्याचा विचार करत असाल तर तुमच्या सर्वात चांगल्या मित्रांना बोलवा.

**कर्क** — मानसिक, नैतिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण घेणेही संपूर्ण विकासासाठी आवश्यक ठरते. सशक्त मन हेच सशक्त शरीरामध्ये वास करते. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. घरातील सणांचे उत्सवाच वातावरण तुमच्यावरील दडपण कमी करेल.

**वृश्चिक** — आज महत्त्वाचे निर्णय घेणे तुम्हाला क्रमप्राप्त ठरू शकते. त्यामुळे तुमचा तणाव वाढेल आणि तुम्ही उदासही व्हाल. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे. मित्र आणि कुटुंबातील सदस्य आपणास साहाय्य आणि प्रेम देतील.

**मीन** — मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल, पण अतिखाणे आणि मद्यपान त्रासदायक ठरू शकते. या राशीतील काही लोकांना आज जमिनीने जोडलेल्या काही मुद्यांना घेऊन धन खर्च करावे लागू शकते. प्रिय व्यक्तीसोबत वादावादी होऊ नये यासाठी वादग्रस्त विषय टाळा.

# ढोल-ताशाच्या गजरात गणेश विसर्जन

**मुंबई :** गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशाच्या गजरात 'पुढच्या वर्षी लवकर या' असे आर्जव करीत मुंबईकरांनी मंगळवारी गणेशाला निरोप दिला. लालबागमधून मंगळवारी सकाळी १०.३० च्या सुमारास निघालेली लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक बुधवारी सकाळी गिरगाव चौपाटीवर पोहोचली आणि बुधवारी सकाळी १०.३० च्या सुमारास लालबागच्या राजाचे विसर्जन झाले. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सुमारे ३७ हजार गणेशमूर्तींचे विसर्जन पार पडले.

गणेशोत्सवाच्या अकराव्या दिवशी म्हणजेच अनंत चतुर्दशीला ठिकठिकाणांहून विसर्जनस्थळाच्या दिशेने गणेश विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. ढोल-ताशाचा गजर, फटाक्यांची आतशबाजी आणि गणेश नामाचा जप करीत भाविक या मिरवणुकांमध्ये सहभागी झाले होते. रखरखत्या उन्हातही गणेशभक्तांचा उत्साह कायम होता. गणरायांच्या दर्शनासाठी गिरगाव, लालबाग – परळ, दादर आदी विविध परिसर गर्दीने फुलून गेले. बहुसंख्य नागरिक गणेश विसर्जन सोहळा पाहण्यासाठी गिरगाव, दादर, जहू चौपाटीवर दाखल झाले होते.

समुद्राला मंगळवारी रात्री भरती येणार असल्याने अनेक मंडळांनी तत्पूर्वीच गणेश विसर्जन केले. तर, अनेक मंडळांच्या मिरवणुकांचा जल्लोष बुधवारी पहाटेपर्यंत सुरू राहिला. मुंबईचा राजा, मुंबईचा महाराजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, ताडदेवचा राजा, खेतवाडीचा राजा, परळचा महाराजा, खेतवडीचा विघ्नहर्ता, गिरगावचा राजा, गिरगावचा महाराजा, मंगलदासचा राजा



भक्तांसह मोठ्या दिमाखात गिरगाव चौपाटीवर दाखल झाले. गणरायाच्या नामघोषात संपूर्ण मुंबई बुधवारी पहाटेपर्यंत दुमदुमत होती. या उत्सवादरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुंबई महानगरपालिका प्रशासन, वाहतूक पोलीस आणि मुंबई पोलिसांनी उत्तम समन्वय साधत महत्त्वाची कामगिरी बजावली.

महापालिकेने यंदा गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची संख्या वाढविली होती. संपूर्ण मुंबईत ६९ नैसर्गिक स्थळांसह अजून २०४ कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था उपलब्ध केली आहे. मंगळवारपासून बुधवारी पहाटेपर्यंत मुंबई व दोन्ही उपनगरात मिळून एकूण ३७०६४ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यात ५७६२ सार्वजनिक तर, ३११०५ घरगुती गणेशमूर्तींचा समावेश होता. तसेच, १९७ गौरींचे विसर्जन करण्यात आले. त्यापैकी कृत्रिम तलावात ७०९ सार्वजनिक, १०९५७ घरगुती आणि ४७ गौरी असे एकूण ११७१३ मूर्तींचे विसर्जन पार पडले.

## महापालिकेतर्फे करण्यात आलेल्या सोयी सुविधा

■ गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक व्हावा यासाठी महापालिका प्रशासनातर्फे दरवर्षी विविध योजना व सुविधा उपलब्ध करण्यात येतात. यंदाही गणेशोत्सव जल्लोषात आणि कुठल्याही अनुचित न घडता पार पडावा, यासाठी पालिकेतर्फे अनेक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यंदा प्रथमच कृत्रिम तलावांची माहिती गुगल मॅपवर उपलब्ध करण्यात आली होती. पालिकेतर्फे गणेशमूर्ती विसर्जनासाठी १५ हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ७१ नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आला होता. समन्वय साधण्यासाठी एकूण १९२ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले होते. तसेच, चौपाट्यांवर सुरक्षेसाठी ७६१ जीवरक्षक, ४८ मोटरबोटी तैनात होते. निर्माल्य संकलित करण्यासाठी १६३ निर्माल्य कलश आणि २७४ निर्माल्य वाहनांची सोय उपलब्ध करण्यात आली होती. दरम्यान, फिरत्या शौचालयांचीही सोय करण्यात आली आहे. चौपाटींच्या किनाऱ्यांवर ४७८ स्टील प्लेट आणि छोट्या मूर्तींच्या विसर्जनासाठी ४३ जर्मन तराफे सज्ज होते.

## पिळवणुकीने पाणी सोडणाऱ्या कंत्राटी कामगारांचे सातार्‍यात हाल



**सातारा :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण म्हणजे लोकांची तहान भागवणारे सक्षम यंत्रणा आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरळीत केला जातो. परंतु पाणी सोडणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हाल होऊन सुद्धा संबंधित ठेकेदारावर कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सातारा जिल्हा मजदूर संघाच्या वतीने कंत्राटी कामगारांनी एकजुटीने बेमुदत धरणा आंदोलन सुरू केले आहे. विशेष बाब म्हणजे सहाय्यक कामगार आयुक्तांनी बोलवल्या बैठकीत सुद्धा अधिकारी हजर राहत नसल्याने """ठेकेदारी आवडे सर्वांनाच"""" असंच काहीसं नमूद करावे लागत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे पूर्वी कायमस्वरूपी काम होत असल्याने कामकाजामध्ये व्यवस्थितपणा येत होता. कुठेही लोकांना आंदोलन करण्याची गरज भासत नव्हती. आताच्या घडीला ठेकेदारी पद्धतीने पाणीपुरवठा काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड व नियुक्ती ही सध्या ठेकेदारी पद्धतीने गेले दीड वर्षापासून सुरू आहे. संबंधित काही कंत्राटी कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी कपात करून कामगार नंबर देणे, राज्य कामगार विमा योजना कपात करून कामगारांना त्यांचा नंबर देणे, ओळखपत्र देणे, सुरक्षा साधना पुरवणे, दरमहा वेतनाची स्लिप देणे असे ठरले होते. परंतु ,अद्यापही एक वर्ष होऊन सुद्धा त्याची कुणीही दखल घेतलेली नाही. सध्या हे कामगार मिळेल त्या वेतनामध्ये राबवत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयांमध्ये कार्यरत अधिकाऱ्यांना विचारले असता आमचा काही संबंध नाही तुमच्या कंत्राट दाराला विचारा असे सांगून या कंत्राटी कामगारांच्या दुःखावर मीठ चोळले जाते. अशी तक्रार कंत्राटी कामगारांची आहे. भविष्य निधीची कपात होते पण ते खात्यात पैसे जमा केले जात नाहीत. वाढीव काम करून सुद्धा त्याचे वेतन दिले जात नाही. साप्ताहिक सुट्टी नाही. दिवाळीला बोनस नाही. शासकीय सुट्टी नाही. हजेरी पुस्तक नाही. अशा अन्यायकारक बाबी बाबत कोणाचेही लक्ष नसल्यामुळे ठेकेदारांची मनमानी कारभार सुरू आहे. अशा कामगारांनी तक्रारी केलेली आहेत याची माहिती संबंधित अधिकारी वर्गाला सुद्धा देण्यात आलेली आहे. असे सांगण्यात आले . महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून पाणीपुरवठा कामाचे टेंडर एका कंत्राटदाराला दिले. त्यांनी त्याच्या सोयीनुसार सब कंत्राटदार नेमून या गरीब व बहुजन समाजातील कामगारांवर दहशत पसरवली आहे. जगातील कामगारांना एक व्हा अशी हाक देणाऱ्या कामगार नेत्यांचे सुद्धा कोणी ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. याबाबत लोकप्रतिनिधींकडे आवाज उठवण्यासाठी सुद्धा प्रयत्न केला. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या सर्व बाबी कामगारांवर अन्यायकारक असल्यामुळे बुधवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी सातारा शहर परिसरात पाणी सोडणाऱ्या कंत्राटी कामगारांनी बेमुदत संपर्क करण्याची भूमिका घेतलेली आहे. त्यामुळे आता सातारा शहर उपनगरातील पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात कंत्राटी कामगारांबाबत कोणतेही धोरण नसल्यामुळे आता साताराचे जिल्हाधिकारी यांनी याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून न्याय द्यावा. अशी मागणी कामगारांनी केलेली आहे.

## अखेर २८ तासांनी संपली पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक

### शेवटचा गणपती भवानी पेठेतील महाराष्ट्र तरुण मंडळाचा



**पुणे -** पुणे शहरातील गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीला महात्मा फुले मंडई येथील पुतळ्यापासून काल सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मानाचा पहिला कसबा गणपतीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि ढोल-ताशांच्या गजरात सुरुवात झाली. त्यानंतर आज दुपारी ३ वाजता भवानी पेठेतील महाराष्ट्र तरुण मंडळांच्या मिरवणुकीने सांगता झाली. ही विसर्जन मिरवणूक तब्बल २८ तास चालली, अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पोलिस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, उपायुक्त संदीपसिंह गिल हे उपस्थित होते. यावेळी अमितेशकुमार म्हणाले की, गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीकरिता जवळपास आठ हजार अधिकारी, कर्मचारी बंदोबस्तावर होते. त्यामुळे शहरात मोठ्या उत्साहात मिरवणूक पार पडली. तसेच लेझर लाईटवर बंदी घालण्यात आली होती. तरीदेखील काही ठिकाणी लेझर लाईटचा वापर केल्याची माहिती समोर येत असून काही मंडळांनी डेसिबलचीदेखील मर्यादा ओलंडल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अशा मंडळांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, आता माझ्याकडे त्याबाबत संख्या उपलब्ध नसल्याचे अमितेशकुमार यांनी सांगितले. तसेच या सर्व घडामोडीदरम्यान सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने योग्य नियोजन केल्याने दुपारी ३ वाजेपर्यंत ही मिरवणूक चालली. या मिरवणुकीत दरवर्षीप्रमाणे यंदादेखील अखेरचा मंडळ भवानी पेठेतील महाराष्ट्र तरुण मंडळ हे गणपती विसर्जनासाठीचे शेवटचे मंडळ ठरले असून ही मिरवणूक २८ तास चालल्याचे त्यांनी सांगितले.

## Delhi HC grants bail to businessman Amit Katyal

**Delhi -** The Delhi High Court on Tuesday granted bail to businessman Amit Katyal, who was accused by the Enforcement Directorate (ED) of money laundering in the alleged land for railway jobs scam in which former railway minister Lalu Prasad too is an accused. The court of Justice Neena Bansal Krishna, while ordering Katyal's release, recorded that the allegation against him pertains to one parcel of land valued at Rs 10.83 lakh of alleged tainted money and thus, the twin test of Section 45 of the Prevention of Money Laundering Act (PMLA) will not be applicable. The court also took into account Katyal's medical condition, observing that the same entitles him for a bail. In its verdict, the court recorded, "The allegations against him are that he had acquired a land valuing (Rs) 10.83 lacs, which was the tainted money on the premise that the proceeds of sale are less than Rs. 1,00,00,000/-. It has been vehemently contended on behalf of the respondent (ED) that as per the prosecution, essentially the allegations made against the petitioner (Katyal) are that he had purchased the land parcel worth Rs. 10.83 lakhs which he transferred subsequently to the other main accused persons but actually the value of the land parcel was much more than its purchase value.

## Pune Metro registers record footfall, revenue collection on Ganesh immersion day

**Pune -** The last day of the Ganesh festival turned out to be Pune Metro's best day ever. On Tuesday, it registered a record footfall of 3,46,633 and a whopping revenue collection of around Rs 55 lakh. Citizens thronged to the heart of the city to witness the famous Ganesh idol immersion procession. Pune Metro was the only unaffected public transport system on the day, as all road transport was affected due to the ban on vehicles on a few main roads of the city. "The passenger turnout was 3,46,633 and the revenue collection through tickets was Rs 54,92,412. The Pune Metro, expecting a high turnout, had increased the metro rail service and declared that it would be operating 24 hours from 6 am on September 17 to 6 am till September 18," said Hemant Sonawane, executive director of Pune Metro.

## धुळे जिल्ह्यात विसर्जनावेळी नदीत बुडून दोन भावांचा मृत्यू



**धुळे :** शहरातील श्रीनगर युवा मित्रमंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत परिसरातील गणेश भक्तांसह घरगुती मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी गेलेल्या दोन्ही भावांचा हत्ती डोहाच्या पुढे असलेल्या पांझरा नदीवरील बंधाऱ्यात बुडाल्याने मृत्यू झाला.

मंगळवारी सायंकाळी ही घटना घडली. धुळे तालुक्यातील बिलाडी गावापासून अलीकडे साधारणपणे चार किलोमीटरवर असलेल्या हत्ती डोहाच्या पुढे पांझरा नदीवर बंधारा आहे. या बंधाऱ्यात धुळे शहरातील अनेक जण गणेश विसर्जन करतात. धुळे तालुक्यातील नेर येथील लोकेश पाटील (१९) आणि चैतन्य पाटील (२२) हे दोघे भाऊही पांझरा नदीवरीतल बंधाऱ्यात घरगुती गणेशाचे विसर्जन करण्यासाठी गेले होते. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाय घसरून दोघेही बुडाले. यावेळी दोघांनीही बचावासाठी प्रयत्न केले, परंतु, दुर्दैवाने आजूबाजूला पट्टीचे पोहणारे कुणीही नसल्याने त्यांचा बचाव करू शकले नाही.

काही जणांनी पाण्यात जाऊन दोघांना बाहेर काढले, लगेचच त्यांना धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. तथापि, डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. दोघेही धुळयातील जयहिंद वरिष्ठ महाविद्यालय रस्त्यावरील एकविरा मोबाईल शॉपचे संचालक सुनील पाटील आणि भाजप मंडळाध्यक्ष छाया पाटील यांची मुले आहेत.

## If DJ is harmful for Ganesh Chaturthi, it is harmful for Eid too, says Bombay High Court



**Mumbai -** While disposing of a petition to ban the use of DJs, dance, music and laser lights during Eid-e-Milad-un-Nabi processions, the Bombay High Court remarked on Wednesday that if DJ music was harmful for Ganesh Chaturthi, it was harmful for the other festival as well.

The PIL petition, filed by four businesspersons from Pune, said neither the Quran nor hadith (the Prophet's tradition) had prescribed the use of DJ music and laser lights for the festival. The petitioners argued that the religious festivals must follow noise- pollution rules and that no religion or community can claim a constitutional right to use DJ music and speakers.

A division bench of Chief Justice Devendra Kumar Upadhyaya and Justice Amit Borkar cited its August 20 order on a petition filed by the Akhil Bharatiya Grahak Panchayat seeking a ban on high-decibel sound systems and hazardous laser beams and said the matter raised in the businesspersons' petition therefore stood concluded.

## Coach Craig Fulton's vision for 2026 World Cup

**New Delhi -** The Asian Champions Trophy gold medal was still dangling around his neck, the smile hadn't yet disappeared and he longed to be with his family. But Craig Fulton's thoughts had already turned to the Indian hockey team's next litmus test: the 2026 World Cup.

In those raw moments, minutes after India defeated China in Tuesday's final, the mastermind of India's Paris Olympic bronze gave a sneak peek into what the immediate future will look like for his team – young, a flush of fresh faces and matches away from home. It could begin as early as late October or November, with a tour to the Netherlands and Belgium with a squad comprising players largely under 25.

The destination and age group aren't chosen on a whim. The European neighbours will be hosting the World Cup in two years and, with an eye on the championship as well as the 2028 Los Angeles Olympics, Fulton hinted he'll pick a bunch of players who will last the full four-year cycle and beyond.




"We are just trying to open up the net a little bit (and) broaden the depth. Then we'll have another camp in 10 days' time for three weeks; another 20 players will come for that. And then hopefully we are getting a tour to Holland and Belgium with kind of an under-25 squad so we are looking forward to putting that team together," Fulton told the Asian Hockey Federation. Until not too long ago, India's hockey ecosystem was obsessed with short-termism and the coaches planned from tournament to tournament, unsure if they'd still be occupying the chair by the time the next one came along. In that backdrop, Fulton's four-year plan for the team is a refreshing change. It helps that his contract, too, has been extended till the LA Olympics.Fulton's faith in the younger players would have been further emboldened after the Asian Champions Trophy triumph. Three years ago, when Graham Reid took a young team to the same competition after the Tokyo Olympics, they could only manage to finish third.

This time, a youthful Indian team won seven matches out of seven, scored more goals than any other team, conceded fewer than the rest and even when not at their best, found a way to win. Like they did during Tuesday's final.

Even a lightweight tournament like this wasn't taken lightly. When India were in Paris, plotting their path to another Olympic podium, a group of 21 players were in Bangalore preparing for the continental championship. Six of them travelled to Inner Mongolia.

Four of them were attackers, signalling the area on the field where India could see the biggest change of personnel in the build-up to the World Cup and subsequ-


# आता शुक्रावर स्वारी!

## चांद्रयान आणि मंगळयान मोहिमेनंतर भारताचं नवं उड्डाण! व्हिनस मिशनला कॅबिनेटची मंजुरी

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कॅबिनेटने आज शुक्रयान व्हिनस ऑर्बिटर मिशनला ला मंजुरी दिली. चांद्रयान आणि मंगळयान या मोहिमानंतर आता शुक्रवार स्वारी केली जाईल. शुक्र हा पृथ्वीच्या सर्वात जवळचा असलेला ग्रह आहे. या मोहिमेद्वारे शुक्र या ग्रहाचा अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासाद्वारे शुक्र ग्रहाबाबत माहिती मिळू शकणार आहे. ही मोहीम शुक्राच्या अभ्यासासाठी महत्त्वाची असणार आहे.

साठी एक खास अंतराळयान तयार केलं जाईल. हे अंतराळयान शुक्राच्या कक्षेत फिरुन त्याचा अभ्यास करणार आहे. शुक्र ग्रहावर काय स्थिती आहे. त्याचे चंद्र कुठले? सूर्याचा शुक्रावर कसा प्रभाव पडतो? असं सांगितलं जातं की शुक्र हा मानवी वस्तीसाठी योग्य असा ग्रह होता. मात्र नंतर इथली स्थिती बदलली. ती कशी बदलली त्याचाही अभ्यास या मोहिमेत केला जाणार आहे. शुक्रयानाची



वैशिष्ट्ये काय असतील? शुक्रयानाचं वजन २५०० किलो असणार आहे. त्यामध्ये १०० किलोंचे पेलोड्स असतील. या शुक्रयानात जर्मनी, स्वीडन, फ्रान्स, रशिया यांचेही पेलोड्स असण्याची शक्यता आहे. या शुक्रयानाचं आयुष्य चार वर्षांचं असेल. शुक्रयान GSLV Mark II या रॉकेटने हे यान लाँच केलं जाईल अशी शक्यता आहे. शुक्रयान अंतराळात गेल्यानंतर शुक्र ग्रहाची संरचना, ज्वालामुखीचं प्रमाण तिथे आहे का? असल्यास ते कसं आहे? शुक्राच्या पृष्ठभागावर असलेला गॅस, त्याचं उत्सर्जन, हवेची गती, ढगांची गती या सगळ्याचा अभ्यास करणार आहे. शुक्रयान शुक्राच्या अंडाकार कक्षेत चारही बाजूनी चक्कर लगावणार आहे.

### मोहिमेसाठी १२३६ कोटींचा निधी मंजूर

Venus Orbiter Misson साठीचं स्पेसक्राफ्ट तयार करणं आणि ते लाँच करणं याची जबाबदारी ISRO ची असणार आहे. ही मोहीम २०२८ मध्ये लाँच केली जाईल अशी चर्चा आहे. या योजनेसाठी १२३६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शुक्रयान स्पेसक्राफ्टसाठी यातले ८२४ कोटी रुपये खर्च होणार आहेत.

### शुक्रयानाबाबत काय म्हणाले होते इस्रोचे प्रमुख?

इस्रोचे प्रमुख डॉ. एस सोमनाथ म्हणाले शुक्र हा अंतराळातील महत्त्वाचा ग्रह आहे. त्याचा ॲसिडिक गुणधर्म कसा आहे? हे तपासण्यासाठी मोहीम आवश्यक आहे. शुक्र ग्रहावर वायमंडळीय दबाव पृथ्वीपेक्षा १०० पटींनी जास्त आहे. अशी माहिती सोमनाथ यांनी मागील वर्षी दिली होती.

# म्हसरुळ शिवारात ३५ लाखांचा चंदन साठा जप्त

● नाशिक, (प्रतिनिधी) :



वनविभाग नाशिक पश्चिमच्या अधिकाऱ्यांनी टाकलेल्या छाप्यात म्हसरूळ शिवारातील रासबिहारी लिंक रोडवरील कित्येक दिवसांपासून बंद असलेल्या बंगल्याच्या आवारात उभ्या असलेल्या वाहनातून तसेच बंगल्यातून सुमारे ३५ लाख रुपयांचा चंदनसाठा जप्त करण्यात आला. नाशिक वनपरिक्षेत्राचे अपर मुख्य वनसंरक्षक हृषिकेश रंजन यांच्या बंगल्यातील चंदनाच्या चार झाडांची १२ सप्टेंबर रोजी चोरांनी तोड केली होती. यानंतर रंजन यांनी नाशिक पश्चिमच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चोरांना पकडण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार नाशिक पश्चिम वनविभागाचे उपवनसंरक्षक भावेश सिद्धेश यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय वनाधिकारी विशाल माळी (दक्षता), सहायक वनसंरक्षक प्रशांत खैरनार, वनक्षेत्रपाल हर्षल पारेकर, प्रभारी वनक्षेत्रपाल सविता पाटील यांच्या पथकाने तपास सुरु केला. तपासादरम्यान वणी दक्षता पथकाला पेठ येथील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार संशयाची सुई म्हसरूळच्या शिवाल्य ट्रेडर्सकडे वळली. म्हसरूळ भागातील संबंधित बंगल्याचा शोध घेतला. अनेक महिन्यांपासून बंद असलेल्या या बंगल्याच्या आवारातील जुन्या वाहनात चंदनाची पाच लाकडे आढळून आली. त्यानंतर वनअधिकाऱ्यांनी बंगल्याची झडती घेतली असता, सुमारे साडेतीन हजार किलोंचा अंदाजे ३५ लाख रुपयांचा चंदनसाठा आढळून आला. बंगल्याच्या मालकाचे नाव गोपाल वर्मा असून वनअधिकाऱ्यांनी त्यांची चौकशी केली असता सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्याचा दावा त्यांनी केला. जप्त करण्यात आलेल्या चंदनाच्या लाकडांच्या साठ्यात काही लाकडांवर वनविभागाकडून करण्यात येणारा क्रमांक आढळला. यामुळे चंदनाची झाडे नेमकी कोठून चोरण्यात आली, याचा उलगडा होण्यास मदत होणार आहे. वनअधिकाऱ्यांनी त्यांचा अभिलेख तपासला असता, चंदनाची साठवणूक करण्याविषयीचा स्थलांतर पास आणि साठवणूक परवाना संबंधित व्यापाऱ्याकडे नसल्याचे उघड झाले.

# रुग्णवाहिकेतून डॉक्टर करायचा दारूची तस्करी, पोलिसांनी रंगेहाथ पकडले

● गडचिरोली, (प्रतिनिधी) :

एकीकडे अपुऱ्या सुविधेमुळे आरोग्य व्यवस्थाच आजारी पडल्याचे चित्र असताना डॉक्टरलाच दारू तस्करी करताना अटक करण्यात आल्याने गडचिरोली आरोग्य विभाग पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. एटापल्ली तालुक्यातून १७ सप्टेंबरला ही संतापजनक घटना समोर आली. एका डॉक्टरला शासकीय रुग्णवाहिकेतून चक्क दारूची वाहतूक करताना पोलिसांनी रंगेहाथ पकडले. यामुळे आरोग्य वर्तुळ हादरले आहे. ब्रम्हानंद रैनू पुंगाटी (२९, रा. बारसेवाडा ता. एटापल्ली) असे त्या डॉक्टरचे नाव आहे. नक्षलप्रभावित व आदिवासीबहुल पिपली बुर्गी प्राथमिक आरोग्य केंद्रात तो कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. १५ सप्टेंबर रोजी पहाटे हालेवारा पोलीस मवेली – हालेवारा – पिपली बुर्गी या मार्गावर नाकाबंदी करत होते. यावेळी (एमएच ३३ टी ४४७८) ही तेथून जात होती. रुग्णवाहिका असल्याने पोलिसांनी सुरुवातीला दुर्लक्ष केले, पण चालकाने गाडी सुसाट नेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी पाठलाग करत रुग्णवाहिका थांबवून तपासणी केली असता आत देशी दारूचे १० बॉक्स व विदेशी दारूच्या ९६ बाटल्या आढळल्या. डॉ. ब्रम्हानंद पुंगाटीसह, शशिकांत बिरजा मडावी




(३३ रा. एटापल्ली), सौरभ गजानन लेखामी ( २० रा. पिपली बुर्गी ), भिवाजी रैनू पदा (३१, रा. पिपली बुर्गी) यांना ताब्यात घेतले तर अंधाराचा फायदा घेत दिलीप लालू लेखामी (रा. पिपली बुर्गी) हा पळून गेला. याप्रकरणी हालेवारा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून देशी – विदेशी ८८ हजार ६० रुपयांची दारू व रुग्णवाहिका जप्त करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दुर्गम भागात वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने अनेकांना जिवा गमवावा लागला आहे. अजूनही अशा घटना समोर येत असतात. पण या डॉक्टरने दारूतस्करीसाठी रुग्णवाहिकेचा वापर केल्याने वैद्यकीय वर्तुळाला धक्का बसला आहे.

### दोन दिवसांची पोलीस कोठडी

दरम्यान, चारही आरोपींना १६ रोजी एटापल्ली न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

### तात्काळ बडतर्फी

पोलिसांच्या कारवाईनंतर जिल्हा परिषद सीईओ आयुषी सिंह यांनी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी डॉ. ब्रम्हानंद पुंगाटी यास तडकाफडकी बडतर्फ केले आहे. यात सहभागी अन्य कर्मचारी रडारवर आहेत. त्यांच्यावरही कारवाई अटळ मानली जात आहे.

# कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात १६ हजार ७८१ गणेशमूर्तींचे उत्साहात विसर्जन

● कल्याण, (प्रतिनिधी) :

अनंत चतुर्दशीच्या दिवशी अत्यंत भक्तीमय वातावरणात कल्याण डोंबिवली परिसरातील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन सामाजिक, सेवाभावी संस्था यांच्या मदतीने तसेच महापालिका अधिकारी कर्मचारी पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्याने संपन्न झाले. कल्याण डोंबिवली महापालिका परिक्षेत्रात भाद्रपद महिन्यातील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन विविध विसर्जन स्थळावर करण्यात आले. यामध्ये विसर्जन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत 52





(POP-46 व शाडू-5) श्री गणेश मूर्तींचे आणि विविध विसर्जन स्थळांवर पीओपीच्या 12965 श्री गणेश मूर्तींचे आणि शाडू मातीच्या 3764 अशा एकूण 16 हजार 781 श्री गणेश मूर्तींचे विसर्जन बुधवारी पहाटेपर्यंत करण्यात आले. कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी निर्मल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती. महानगरपालिकेने प्रमुख विसर्जन स्थळांवर फायर ब्रिगेड, स्वयंसेवक, रबर बोट त्याचप्रमाणे महापालिकेची ॲम्बुलन्स इ. सुविधा उपलब्ध केली होती. मंगळवारी दुपारी महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांनी स्वतः कल्याण डोंबिवलीतील विसर्जन स्थळांना भेटी देऊन विसर्जन व्यवस्थेची पाहणी केली. विसर्जन स्थळी जमा झालेले निर्माल्य डोंबिवली येथील श्री गणेश मंदिर संस्थान, एमआयडीसी येथील खत प्रकल्प,उंबर्डे बायोगॅस प्रकल्प त्याचप्रमाणे कचोरे बायोगॅस प्रकल्प , आयरे बायोगास प्रकल्प येथे पाठवण्यात आले आहे. या कामी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी संस्था एन एस एस चे विद्यार्थी यांचे सहकार्य महापालिकेस लाभले. अशाप्रकारे खाडी, नदी यामध्ये निर्माल्य न टाकल्यामुळे जलस्रोतातील प्रदूषणात घट होण्यास मदत झाली आहे.

# प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन !



● मुंबई, (प्रतिनिधी) :


केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती मंत्रालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव, सचिन कावळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# संलग्न झोपु योजनांबाबत प्राधिकरणाच्या मनमानीला चाप, आता अधिकार महापालिका आयुक्तांकडे!

● मुंबई, (प्रतिनिधी) :

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसोबत इतर नियमावली संलग्न करून परस्पर योजना राबवून विकासकांना चटईक्षेत्रफळाचा भरमसाट लाभ मिळवून देण्याच्या झोपु प्राधिकरणाच्या मनमानीला आता महापालिकेने चाप लावला आहे. अशा योजनांसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे सहायक आयुक्तांचे अधिकार काढून घेण्यात आले असून ते अधिकार आयुक्तांनी स्वत:कडे घेतले आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) तसेच झोपडीवासीयांसाठी संक्रमण सदनिका बांधून देण्याच्या



मोबदल्यात खुल्या विक्रीसाठी चटईक्षेत्रफळ उपलब्ध करुन देणारी ३३(११) ही नियमावली आहे. या नियमावलीत तीन इतके चटईक्षेत्रफळ मिळते. मात्र रस्त्याची रुंदी २७ मीटर किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास चार इतके चटईक्षेत्रफळ मिळते. परंतु मुंबईत २७ मीटर रस्ता क्वचितच सापडतो. अशा वेळी ३३ (११) या नियमावलीसोबत ३३ (१२)(ब) ही नियमावली संलग्न केल्यानंतर रस्त्याची रुंदी कितीही असली तरी चार इतके चटईक्षेत्रफळ मिळते. रस्त्यावरील अतिक्रमणे वा अडथळे दूर करण्यासाठी ही नियमावली आहे.

मात्र झोपु प्राधिकरणाने अशा पद्धतीच्या संलग्न योजना मंजूर करुन विकासकांना चटईक्षेत्रफळाचा लाभ मिळवून दिला, असा आक्षेप पालिकेकडून घेण्यात आला. याबाबतचे वृत्त 'लोकसत्ता'ने दिले होते. अशा संलग्न योजनांना यापुढे ना हरकत प्रमाणपत्र देऊ नये आणि याआधी दिलेली ना हरकत प्रमाणपत्र रद्द करावीत, असे आदेश त्यावेळी पालिकेच्या सर्व सहायक आयुक्तांना जारी केले होते. आता हे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. रस्त्यावरील अतिक्रमणे व अडथळे दूर करण्यासाठी पालिकेच्या सहायक आयुक्तांनीच पत्रे दिली.

# आरोग्य यंत्रणेचे जाळे अधिक घट्ट करण्यावर भर निवासी डॉक्टरांकरिता आवश्यक सोयी- सुविधांसाठी निधी देणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय- रुग्णालयास भेट देऊन मुख्यमंत्र्यांनी डॉक्टरांशी साधला संवाद 'चिठ्ठीमुक्त घाटी' उपक्रमाचे कौतुक

● छत्रपती संभाजीनगर, (प्रतिनिधी) :

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात याला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून आरोग्य यंत्रणेचे जाळे अधिक घट्ट करण्यावर भर आहे. छत्रपती संभाजीनगर येथील निवासी डॉक्टरांसाठी आवश्यक त्या सोयी- सुविधा उभारणीसाठी आवश्यक तो निधी दिला जाईल, त्यांच्या सुरक्षेबाबतही शासन डॉक्टरांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. 'चिठ्ठीमुक्त घाटी' या उपक्रमाबद्दल मुख्यमंत्र्यांनी रुग्णालय प्रशासनाचे कौतुक केले.

छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास (घाटी) मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आज भेट देऊन अतिविशेषोपचार रुग्णालयाची पाहणी केली आणि डॉक्टरांशी संवाद साधला. यावेळी खासदार सर्वश्री डॉ. भागवत कराड, संदीपान भुमरे, कल्याण काळे, आमदार सर्वश्री संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, प्रधान सचिव विकास खारगे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी



दिलीप स्वामी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक डॉ.अजय चंदनवाले, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे उपस्थित उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, तुम्ही सगळे डॉक्टर सामान्यांसाठी विघ्नहर्त्याची भूमिका पार पाडतात. अडीच वर्षांपूर्वी आमचं सरकार आलं तेव्हापासून सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून निर्णय घेत आलो आहोत. आरोग्याच्या क्षेत्रातही सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून निर्णय घेतले आहेत. राज्यातील सामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी पुढाकार घेतला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी डॉक्टरांना 5 हजार रुपये दरमहा सुधारित मानधन देण्याचा निर्णय घेतला असून वैद्यकीय महाविद्यालयातील इंटर्नशिप विद्यार्थ्यांना विद्यावेतनात भरीव वाढ करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, सद्यस्थितीमध्ये अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या इमारतीमध्ये बाहयरुग्ण विभाग, कक्ष, आय.सी.यू. शस्त्रक्रियागृहे इत्यादी सेवा युरॉलॉजी, न्युरोसर्जरी, कार्डियॉलॉजी, प्लॅस्टिक सर्जरी, अशा प्रकराच्या अतिविशेषोपचार सेवा सुरु आहेत. यासेवेचा लाभ मराठवाडयासह बुलढाणा, वाशिम, जळगाव, नंदुरबार, धुळे, अहमदनगर अशा एकूण 14 जिल्ह्यामधून येणाऱ्या गोर-गरीब रुग्णांना होत आहे. घाटी रुग्णालयाचा मराठवाड्यातील लाखो रुग्णांना फायदा होतोय. ज्यावेळी हे महाविद्यालय सुरु झाले त्यावेळी फक्त 50 विद्यार्थी क्षमता होती व रुग्णखाटांची संख्या 300 होती. आता विद्यार्थी क्षमता 200 इतकी झालेली आहे.